अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १४५ । सोमवार ९ मार्च २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



# भारतच विश्वविजेता..!

## सॅमसन-अभिषेक-ईशानच्या वादळी खेळामुळे भारताने रचला सर्वोच्च धावसंख्येचा इतिहास

## १८ षटकार, १८ चौकार अन् २५५ धावा

### भारताने प्रथम टी-२० विश्वचषक घरच्या मैदानावर जिंकला पहिल्यांदा सलग दोनदा (बॅक-टू-बॅक) जेतेपद

### टी-२० विश्वचषक जिंकण्याची हॅट्रिक



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहमदाबाद : टी-२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडसमोर २५६ धावांचे अवघड लक्ष्य ठेवले आणि भारताने घरच्या मैदानावर तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकला. न्यूझीलंडला १९ षटकांत सर्वबाद करून १५९ धावांवर गुंडाळण्यात भारतीय संघाला यश आले.**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या रोमांचक लढतीत भारतीय फलंदाजांनी जबरदस्त कामगिरी करत विक्रमी धावफलक उभारला. भारताने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ५ बाद २५५ धावा केल्या. या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील सर्वोच्च धावसंख्या आहे. भारतीय संघाने केलेल्या दावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडची पूरती दमछाक झाली. लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडला सुरुवातीपासूनच धक्के बसले. टिम सिफर्टने ५२ धावा केल्या, पण जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल (३ विकेट्स), वरुण चक्रवर्ती यांच्या भेदक माऱ्याने न्यूझीलंड १५९ धावांवर ढेपाळली. शेवटची विकेट अभिषेक शर्माने घेतली.

संजू सॅमसनने ४६ चेंडूत ८९ धावा (५ चौकार, ८ षटकार) फटकावत मध्यक्रमाला मजबूत आधार दिला. अभिषेक शर्माने स्फोटक सुरुवात करत २१ चेंडूत ५२ धावा केल्या, तर ईशान किशननेही अर्धशतक झळकावले. शेवटच्या षटकांत शिवम दुबेने २४ धावा (पान ४ वर..)

# राज्यात १ लाख १५ हजार ५३० कोटींच्या नदीजोड प्रकल्पांना मान्यता

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती : वैतरणा-उल्हास खोऱ्यातील अतिरिक्त ५४ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणार





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर आणि मराठवाड्यातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी राज्य सरकारने नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारनच्या जलसंपदा मंत्रालयाने राज्यातील दुष्काळग्रस्त भागांना सुजलाम-सुफलाम करण्यासाठी १ लाख १५ हजार ५३० कोटी रुपयांच्या एकूण प्रकल्पांना मान्यता देऊन भरीव निधीची तरतूद केली असल्याची माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दैनिक राष्ट्र सह्याद्रीशी बोलताना दिली.

वैतरणा-उल्हास खोऱ्यातील अतिरिक्त पाणी गोदावरीत वळवण्याचा महत्त्वाचा निर्णयवैतरणा आणि उल्हास ही कोकण विभागातील (पान ४ वर..)

### वैनगंगा-नळगंगा नदीजोड

९४,९६८ कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मान्यता. भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीचे पाणी बुलढाणा जिल्ह्यातील पूर्णा-नळगंगा नदीत आणले जाईल. ३८८.२८ किमी लांबीचा कालवा आणि १३ बोगदे (एकूण २०.४९ किमी) यांचा समावेश. विदर्भातील ८ जिल्हे (नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम, भंडारा) आणि ३८ तालुक्यांना थेट फायदा.

### दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड

१३,४९७ कोटी रुपयांची मान्यता. यातून कोकणातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळवले जाईल.

### नार-पार गिरणा नदीजोड

७,४६५ कोटी रुपयांची मान्यता. उत्तर महाराष्ट्रातील (नाशिक, जळगाव) दुष्काळी भागाला फायदा. पश्चिम वाहिन्या नद्यांचे अतिरिक्त पाणी गिरणा खोऱ्यात वळवून ४९,५१६ हेक्टर जमीन सिंचनाखाली येईल.

# सोलर पंपच्या नावाखाली ४० शेतकऱ्यांची फसवणूक, तिघांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** महाराष्ट्र शासनाच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेअंतर्गत सोलर पंप मिळवून देण्याचे आमिष दाखवून ४० शेतकऱ्यांची तब्बल ५ लाख ४७ हजार ५२० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सुरुवातीला काही पंप मंजूर करून दिल्याने त्यांच्यावर विश्वास बसला. त्यानंतर श्रीरामपूर तालुक्यासह कन्नड व वैजापूर येथील ४० शेतकऱ्यांकडून एकूण ४ लाख ५२ हजार ५२० रुपये ऑनलाईन तर ८० हजार रुपये रोख घेण्यात आले. मात्र प्रत्यक्षात सोलर पंप न मिळाल्याने संशय निर्माण झाला.**

याबाबत संदीप म्हाळु राऊत (सीएससी सेंटर चालक, निपाणी वडगाव, ता. श्रीरामपूर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार ओंकारेश्वर राजेंद्र रासकर (रा. केडगाव, ता. जि. अहिल्यानगर), किरण बोरुडे (रा. केडगाव, नगर) आणि संदीप बनकर (रा. श्रीगोंदा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या (पान ४ वर..)

## महत्त्वाचे..

### सिंहगड डेंटल कॉलेजचे विभाग प्रमुख राजू पाटील यांची आत्महत्या

पुणे : सिंहगड डेंटल कॉलेजच्या विभागप्रमुखांनी राहत्या घरी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. घटनास्थळी आत्महत्येपूर्वी लिहिलेली सुसाईड नोट सापडली आहे. राजू पाटील असे आत्महत्या केलेल्या प्राध्यापकाचे नाव असून त्यांच्या मृत्यूनंतर कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पाटील हे पुण्यातील सिंहगड डेंटल कॉलेजमध्ये विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते. ही घटना शनिवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली जेव्हा पाटील यांची पत्नी घरी आल्यानंतर त्यांना हा सगळा निदर्शनास आला. त्यांनी तात्काळ पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाटील यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. कामाचा ताण वाढल्यामुळे आपण आत्महत्या करत असल्याचं पाटील यांनी त्यांच्या सुसाइड नोटमध्ये लिहिले आहे. काही दिवसांपूर्वी, सिंहगड डेंटल कॉलेजची मान्यता रद्द करण्यात आली होती. शिक्षकांचे थकीत वेतन आणि शैक्षणिक नुकसानीकडे दुर्लक्ष केल्यामुळे सिंहगड दंत महाविद्यालयावर विद्यापीठाने मोठी कारवाई केली होती.

# केवळ शिर्डीचा नाही, मी देशाचा खासदार..!

## तिसऱ्यांदा राज्यसभेवर वर्णी लागल्यानंतर रामदास आठवलेंची तूफान फटकेबाजी



राष्ट्र सह्याद्री शिर्डी विभागीय कार्यालयास भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** मला शिर्डीचा खासदार होण्याची मनापासून इच्छा होती, तसे झाले नाही. पण साईबाबांच्या कृपेमुळे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विश्वासामुळे सलग तिसऱ्यांदा राज्यसभेवर जाण्याची संधी मिळाली. त्यामुळे आता मी राज्याचा (राज्यसभा) खासदार आहे, देशासाठी काम करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य आहे, अशा शब्दांत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आपल्या मनातील भावना व्यक्त केल्या. रविवारी ना. रामदास आठवले हे शिर्डी दौऱ्यावर सपत्नीक साई दर्शनासाठी आले होते.

यावेळी संस्थांनचे वतीने मंदिर प्रमुख विष्णु थोरात त्यांचे स्वागत केले. दर्शनानंतर ना. रामदास आठवले यांनी दैनिक राष्ट्र सह्याद्री माध्यम समूहाच्या विभागीय कार्यालयास भेट दिली. राष्ट्र सह्याद्रीने सात वर्षात वाचकांच्या मनाचा ठाव घेऊन माध्यम क्षेत्रात आपले स्थान निर्माण केल्याबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले. शिर्डी विभागीय कार्यालय प्रमुख पत्रकार अशोक दुशिंग यांनी त्यांचे स्वागत केले.

नामदार आठवले यांनी राष्ट्र सह्याद्रीच्या अंकाचे बारकाईने वाचन करत राष्ट्र सह्याद्री माध्यम समूहाची वाहवा केली. तसेच त्यांनी राष्ट्र सह्याद्री माध्यम समूह मीडिया क्षेत्रात प्रिंट वेब आणि सोशल मीडिया मॅनेजमेंट कार्याची अस्थेवाईक चौकशी करत शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्र सह्याद्री न्यूज चॅनलचे कोऑर्डिनेटर योगेश कडस्कर, सामाजिक कार्यकर्त्या संगीताताई नरोडे, साई संस्थांचे सुरक्षा अधिकारी कैलाश शेजवळ, उद्योजक अनिल लोढा, उद्योजक अनिल मुसमाडे, दीपक बोधक यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना ना. आठवले यांनी आपल्या राजकीय प्रवासावर भाष्य करण्यासोबतच विविध राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय मुद्द्यांवर आपली (पान ४ वर..)

### अजितदादांच्या विमान अपघाताची सखोल चौकशी व्हावी

**अजित पवारांच्या जाण्याने महाराष्ट्राचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले आहे. प्रफुल्ल पटेल हे नागरी उड्डाण मंत्री असताना त्यांचे आणि व्हीएसआर मालकांचे जुने संबंध असावेत, त्यातूनच ते लग्नाला गेले असतील. मला या प्रकरणात घातपात असावा असे वाटत नाही, मात्र अजित पवारांच्या मृत्यूची सखोल चौकशी झालीच पाहिजे.**

**– ना. रामदास आठवले**

## वरात निघाली जोरात...

# डीजे चालकासह नवरदेवाविरुद्ध गुन्हा!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर:** शहरातील बोल्हेगाव उपनगरात रात्रीच्या वेळी नियमांची पायमल्ली करून ध्वनिक्षेपकाचा दणदणाट करणे नवरदेवासह चालकाच्या अंगलट आले आहे. जिल्हादंडाधिकाऱ्यांचे प्रतिबंधात्मक आदेश झुगारून विवाहाची वरात काढल्याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात नवरदेवासह ध्वनीचेपक यंत्रणेच्या चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलिस नाईक रवींद्र तुकाराम धुंगासे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, काल, शनिवारी रात्री बोल्हेगाव उपनगरातील आंबेडकर चौकात एका विवाह समारंभातील नवरदेवाची वरात काढण्यात आली होती. मिरवणुकीत मर्यादेबाहेर ध्वनिक्षेपकाचा आवाज सुरू असल्याने ध्वनी प्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवले गेले. गस्त घालणाऱ्या तोफखाना पोलिसांच्या पथकाने ध्वनिक्षेपक बंद करण्याच्या सूचना वरातीतमधील प्रमुख लोकांसह धनिक्षेपक यंत्रणेच्या चालकास दिल्या. मात्र, नवरदेव आणि ध्वनिक्षेपक चालकाने पोलिसांच्या सूचनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले.

काही वेळातच पोलिसांनी ध्वनीतीव्रता मोजमाप यंत्राद्वारे तपासणी केली असता आवाजाची पातळी ८२.४ डेसिबल इतकी आढळून आली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे आणि जिल्हादंडाधिकारी यांच्या प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता व पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. शहरात प्रथमच अशा स्वरूपाची कारवाई झाल्याने, या कारवाईने शहरात खळबळ उडाली असून पोलिस प्रशासनाने नियमांचे पालन करण्याचे संकेत दिले आहेत. काही दिवसांपूर्वीच उपविभागीय पोलीस अधिकारी (पान ४ वर..)

# पतीचे विवाहबाह्य संबंध, छळामुळे डॉ. मनीषा जेजुरकर यांची आत्महत्या!

**नाशिक :** प्रसिद्ध आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. मनीषा जेजुरकर (वय ४०) यांनी ६ मार्च रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास गंगापूर रोडवरील रेवती ब्लू अपार्टमेंट, डी. के. नगर येथील राहत्या घरी गळफास घेऊन आयुष्य संपवले. प्रारंभी अकस्मात मृत्यूची नोंद झाली असली तरी आता कुटुंबीयांच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनीषा यांच्या भावाने त्यांच्या पती डॉ. निलेश जेजुरकर (नाशिक जिल्हा सामान्य रुग्णालयातील मनोविकारतज्ज्ञ) यांचे विवाहबाह्य संबंध असल्याचा संशय आहे. गेल्या दीड वर्षांपासून याच कारणावरून मनीषा यांना मानसिक आणि शारीरिक छळ सहन करावा लागत होता, असा दावा कुटुंबीयांनी केला.

पतीच्या बाहेरच्या संबंधांमुळे माझ्या बहिणीचा सतत छळ होत होता, यामुळे ती हताश झाली, असे भावाने सांगितले. गंगापूर पोलीस ठाण्यात कुटुंबीयांच्या तक्रारीवरून छळ (क्रूरता), आत्महत्येस प्रवृत्त केल्याबाबत (कलम ३०६) आणि इतर संबंधित पान ४ वर..)

## महिलादिनी स्तुत्य उपक्रम

# कोळगावात शिवी दिल्यास ५०० रुपये दंड

## महिलांचा 'शिवी बंद'चा ठराव




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत श्रीगोंदा तालुक्यातील मौजे कोळगाव येथे महिलांनी एक अनोखा आणि धाडसी निर्णय घेत गावात शिवी बंद करण्याचा ठराव एकमताने मंजूर केला. गावात कोणीही आई-बहिणींवरून शिवीगाळ करताना आढळल्यास त्याचा व्हिडिओ ग्रामपंचायतीकडे सादर करून संबंधित व्यक्तीकडून ५०० रुपये दंड वसूल करण्याचा निर्णय महिला ग्रामसभेत घेण्यात आला.

८ मार्च २०२६ रोजी कोळगाव येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शासन निर्णयानुसार विशेष महिला ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अंगणवाडी सेविका श्रीमती शकुंतला देशमुख होत्या. अध्यक्षपदाची सूचना सौ. विद्या लगड यांनी मांडली, तर त्यास अनुमोदन सौ. मीना भापकर यांनी दिले. ग्रामपंचायत अधिकारी एस. एस. कवडे यांनी ग्रामसभेचा अजेंडा वाचून दाखवला.ग्रामसभेत गावातील शेतीसह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करून त्यांचे कौतुक करण्यात आले. त्याचबरोबर गावातील सामाजिक वातावरण सुधारण्यासाठी आणि महिलांचा सन्मान राखण्यासाठी शिवीगाळ बंदीचा ठराव मंजूर करण्यात आला.यासोबतच गाव स्वच्छ ठेवण्याबाबतही कडक निर्णय घेण्यात आला. कोणाच्या घराजवळ किंवा दुकानाजवळ कचरा दिसल्यास त्याचा फोटो ग्रामपंचायतीकडे दिल्यानंतर संबंधित व्यक्तीकडून १०० रुपये दंड आकारण्याचा ठरावही सर्वानुमते मंजूर करण्यात आला. तसेच व्यसनमुक्ती आणि महिला सक्षमीकरणासाठी ठोस उपाययोजना राबवण्याचा निर्धार महिलांनी व्यक्त केला.या ग्रामसभेला लोकनियुक्त सरपंच पुरुषोत्तम यशवंत लगड, उपसरपंच विलास बाळासाहेब शितोळे, ग्रामपंचायत सदस्य जयराज लगड, महेंद्र रणसिंग, कल्याण आढाव, प्रशांत आढाव, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष दत्तात्रय (गोटू) लगड, ग्रामपंचायत अधिकारी एस. एस. कवडे, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा सेविका तसेच मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.यावेळी सरपंच पुरुषोत्तम लगड यांनी उपस्थित महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देत महिला सक्षमीकरणासाठी ठोस पावले उचलण्याची गरज अधोरेखित केली. पुढील वर्षी महिला दिन आणखी मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात श्रीमती शकुंतला देशमुख यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा देत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान केल्याबद्दल ग्राम पंचायत व उपस्थितांचे आभार मानले.

## संपादकीय

# राष्ट्रपतींच्या नाराजीला राजकीय रंग देणे गैर

भारताच्या लोकशाही व्यवस्थेत घटनात्मक पदांचा सन्मान हा अविभाज्य भाग आहे. पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यात ७ मार्च २०२६ रोजी आयोजित नऊव्या आंतरराष्ट्रीय संताल परिषदेवरून उफाळलेला वाद हा केवळ राजकीय पक्षांच्या संघर्षापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक उत्सवाच्या नियोजनातील त्रुटी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या जाहीर नाराजीमुळे देशव्यापी चर्चेचा विषय ठरला आहे. राष्ट्रपतींनी परिषदेच्या ठिकाणातील बदलामुळे संताल बांधवांना सहभागी होता आले नाही, याबद्दल व्यक्त केलेली खंत ही एक दुर्मिळ घटना आहे. या प्रकरणाने राज्य सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभे केले असले, तरी ते राजकीय द्वेषाच्या जाळ्यात अडकवणे हे लोकशाहीला शोभणारे नाही.

परिषदेचे मूळ ठिकाण विधाननगर (फांसीदेवा ब्लॉक) असताना ते गोसाईनपूर (बागडोग्रा परिसर, सिलिगुडीजवळ) येथे बदलण्यात आले. राष्ट्रपती मुर्मू यांनी संबोधन करताना सांगितले की, मूळ जागेवर पाच लाख लोक सहज जमू शकले असते, पण नव्या ठिकाणामुळे सामान्य आदिवासी जनता आपल्या सांस्कृतिक महोत्सवापासून वंचित राहिली. त्या म्हणाल्या, ''येथे विस्तीर्ण जागा उपलब्ध असताना, प्रशासनाच्या मनात काय चालले होते?'' याशिवाय, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि राज्य मंत्र्यांच्या अनुपस्थितीवरही त्यांनी खंत व्यक्त केली. ''मुख्यमंत्री आणि मंत्री यांनी येणे अपेक्षित असते, पण ते आले नाहीत. ममता दीदी माझी धाकटी बहीण आहे, ती माझ्यावर रागावली आहे का?'' असे त्या म्हणाल्या. राष्ट्रपतींसारख्या घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तीने अशा प्रकारे जाहीरपणे प्रशासकीय त्रुटींवर बोट ठेवणे ही असामान्य बाब आहे, जी राज्य-केंद्र संबंधातील तणाव दर्शवते.

या घटनेवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी तृणमूल काँग्रेस सरकारवर कठोर टीका केली. मोदींनी हे ''लज्जास्पद आणि अभूतपूर्व'' म्हटले, तर शाह यांनी ''लोकशाहीला दुखावणारे'' असे वर्णन केले. दुसरीकडे, मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी प्रत्युत्तर देत भाजपवर आरोप केला की, ते राष्ट्रपतींना राजकारणात ओढत आहेत. ''राष्ट्रपतींनी आदिवासी प्रश्नांवर चिंता व्यक्त करावी, पण भाजपच्या सल्ल्याने राजकारण करू नये,'' असे त्या म्हणाल्या. केंद्रीय गृहसचिवांनी पश्चिम बंगालच्या मुख्य सचिवांकडून अहवाल मागितला आहे, ज्यामुळे हे प्रकरण अधिक गंभीर झाले आहे.

या वादातून दोन महत्त्वाचे मुद्दे समोर येतात. पहिला, आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन करताना राज्य सरकारची अनास्था दिसून येते. संताल परिषद हा आदिवासी संस्कृतीचा उत्सव आहे, आणि राष्ट्रपतींच्या उपस्थितीमुळे त्याला राष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले होते. ठिकाणातील बदलामुळे हजारो आदिवासींना सहभागी होता आले नाही, हे दुर्दैवी आहे. दुसरा मुद्दा म्हणजे, घटनात्मक पदांचा सन्मान. राष्ट्रपती हे अपक्ष पद आहे, आणि त्यांचा अवमान म्हणजे लोकशाही मूल्यांचा अपमान आहे. पक्षीय संघर्षात राष्ट्रपतींना ओढणे हे कोणत्याही पक्षाला शोभणारे नाही. मात्र, राष्ट्रपतींनी जाहीरपणे व्यक्त केलेली नाराजी हीदेखील एक जबाबदारीची जाणीव दर्शवते, जी आदिवासी हितांचा विचार करणारी आहे.

लोकशाहीत सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील वाद सामान्य आहेत, पण ते घटनात्मक संस्थांच्या पलीकडे जाऊ नयेत. हे प्रकरण राज्य-केंद्र संबंध सुधारण्याची संधी ठरू शकते. आदिवासी समाजाच्या सन्मानासाठी सर्व पक्षांनी एकत्र येणे गरजेचे आहे, अन्यथा असे वाद केवळ राजकीय लाभासाठी वापरले जातील. शेवटी, राष्ट्रपतींच्या नाराजीला राजकीय रंग देण्याऐवजी, आदिवासी विकासावर लक्ष केंद्रित करणे हेच खरे लोकशाहीचे लक्षण असेल.

# सहकारी संस्थांनी व्यावसायिक दृष्टीकोन ठेवून काम करावे : ना. विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** जिल्ह्यात पायाभूत सुविधांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होत असल्याने दळणवळण देखील वाढले आहे. अनेक राष्ट्रीय महामार्ग विकसित होत असल्याने भविष्यात वाहनांची गरज लक्षात घेवून प्रवरा फळे भाजीपाला सहकारी संस्थेने सुरू केलेला सीएनजी पंप सुरू करून सहकारी संस्थेची लोकाभिमुखता वाढविणारा असल्याचे गौरवोद्गार जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे यांनी काढले.



लोणी येथील प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था प्रवरानगर यांच्या वतीने इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड आणि भारत पेट्रोलियम सीएनजी पंपाचे लोकार्पण सोहळ्यात ना. विखे बोलत होते. प्रवरा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्करराव खर्डे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, विखे कारखान्याचे उपाध्यक्ष सोपानराव शिरसाठ, ट्रक वाहतूक सोसायटीचे चेअरमन नंदकिशोर राठी, प्रवरा प्रवरा फळे भाजीपाला सोसायटीचे अध्यक्ष मकरंद गुणे,उपाध्यक्ष विजयराव लगड, मच्छिंद्र थेटे, सुनिल जाधव, माजी जि. प.सदस्या कांचनताई मांढरे, भारत पेट्रोलियमचे अनिश मुतालिक, तरुण गर्ग प्रवण अभिषेक, तालुका कषि अधिकारी आबासाहेब भोरे, जिल्हा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, सहाय्यक निबंधक नामदेव ठोंबळ संस्थेचे सर्व संचालक आणि विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना मंत्री विखे म्हणाले, आज सहकारी संस्थाचा कारभार पारदर्शी आणि लोकाभिमुख व्हावा यासाठी केंद्रीय सहकार मंत्रालयाने धोरण घेवून संस्थाना अनेक व्यवसाय करण्याची संधी दिलेली आहे. व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून संस्थाना वाटचाल करावी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रवरा भाजीपाला सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी आणि फार्मर प्रोड्युसर कंपन्यांच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीला आणि सेंद्रिय भाजीपाला उत्पादन विक्री व्यवस्थेचा विचार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करून शेतकऱ्यांच्या गरजेनुसार व्यवसाय करण्यासाठी संस्थेने काम करण्याचे आवाहन आवाहन मंत्री विखे यांनी केले.

यावेळी डॉ. भास्करराव खर्डे यांनी संस्थेच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या विविध सेवा सुविधांमुळे या भागातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होत आहेत शेतकरीभिमुख काम संस्थेच्या माध्यमातून असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकामध्ये अध्यक्ष मकरंद गुणे यांनी संस्थेच्या विविध उपक्रमाची माहिती देण्याबरोबरच संस्थेच्या भविष्यातील वाटचाली बद्दल माहिती माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शांताराम चौधरी यांनी तर आभार माधवराव कडसकर यांनी मानले.

## कै.अरुण साहेबराव कवडे वाचनालयास आदर्श सार्वजनिक वाचनालय पुरस्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील नांदुरी दुमाला येथील कै अरुण साहेबराव कवडे सार्वजनिक वाचनालयासम साहित्य कला मंच या संस्थेच्या वतीने आदर्श सार्वजनिक वाचनालय पुरस्कारसंगमनेर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई तांबे व सुप्रसिद्ध कवी शशिकांत शिंदे यांच्या हस्ते मिळाला आहे. वाचनालयाचे प्रतिनिधी म्हणून गाव तिथे वाचनालय निर्माण व्हावे यासाठी सातत्याने अनेक वर्षापासून वाचनालय चळवळीसाठी काम करणारे तसेच कै. अरुण साहेबराव कवडे सार्वजनिक नांदुरी दुमाला, वाचनालयाचे संस्थापक प्रमुख व राजहंस दूध संघाचे संचालक विलास कवडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा सुनीता घुले, कार्याध्यक्ष संजय नवले सर, डी एम लांडगे, जेष्ठ विधितज्ज्ञ अँड सुभाषराव गोडगे, अँड प्रदिप



मालपाणी, कवी रमेश शिंदे, कवी डॉ विवेक वाकचौरे, नाना गुजराथी, अनिल देशपांडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. संगमनेर तालुक्यातील नांदुरी दुमाला येथे या संस्थेची स्थापना २००० साली झालेल्या कै अरुण साहेबराव कवडे सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने व जयहिंद वाचन चळवळ गेली सव्वीस वर्षे प्रभावीपणे राबवली जात आहे. ग्रामीण भागात विद्यार्थी ,युवक ,ज्येष्ठ नागरिक यांना १७ वृतपत्रे मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतील तसेच ,साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, दररोज सकाळी वाचकांना उपलब्ध आहेत.त्याचप्रमाणे वाचनालयामध्ये विविध काव्यसंग्रह,कथासंग्रह, कादंबरी ,चरित्र ,आत्मचरित्र तसेच विविध ग्रंथसंपदा मनोरंजन आणि ज्ञान संवर्धनासाठी सुसज्जपणे उपलब्ध करून देण्यात आली आहे .स्पर्धा परीक्षा तयारीसाठी युवकांना मार्गदर्शक असे संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत.बालवाचनालय, महिला वाचनालय, स्पर्धा परीक्षांसाठी ग्रंथसंपदा विभाग असे कक्ष वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वाचनालयाच्यावतीने नेहमीच दर्जेदार पुस्तके अधिकाधिक लोकांपर्यंत या संस्थेच्या माध्यमातून ज्ञानदानाचे कार्य पोहचवण्यासाठी प्रयत्न करत आहे.वाचन चळवळ ही गावातील तरुण पिढीची भाग्यरेषा असून यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहे. उत्कृष्ट वाचनालय पुरस्कार समितीच्या सदस्यांनी वाचनालयातील सर्व मार्गदर्शक वाटचालीच्या उपक्रमाची दखल घेऊन पुरस्कारासाठी निवड केली.या पुरस्काराबद्दल राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ सुधीर तांबे, नाशिक पदवीधर विभागाचे आमदार सत्यजित तांबे, ग्रंथालय विभागाचे संचालक अशोकराव गाडेकर, रमेश शिंदे,राजहंस दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख , जयहिंद. चळवळ अध्यक्षा सौ दुर्गाताई तांबे , एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ जयश्रीताई थोरात, वाचनालयाचे मार्गदर्शक साहेबराव कवडे आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी वाचनालयाचे पदाधिकारी, सभासद, वाचक वर्ग यांना शुभेच्छा दिलेल्या आहेत.

## दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना ग्रेस गुणासाठी ऑनलाईन सुविधा

**(शफीक बागवान) | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर:** क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारे ग्रेस मार्क मिळविण्याची ऑनलाईन सुविधा अधिकृतपणे सुरु करण्यात आली आहे. जिल्ह्यातील दहावी व बारावीची परीक्षा देणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना ग्रेस गुणाचा फायदा मिळणार असून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाना प्रस्ताव ऑनलाईन सादर करावे लागणार आहेत. जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी पात्र खेळाडूचे अर्ज १० एप्रिल २०२६ पर्यंत आपले सरकार या अधिकृत संकेत स्थळावर ग्रेस गुण सवलतीचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.क्रीडा क्षेत्रात चमकदार कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याच्या शैक्षणिक वर्षात सवलतीचे गुण मिळावे यासाठी ही सूविधा आपले सरकार (URL:https:// aaplesaka. mahaonline.gov.in) या संकेत स्थळावर मागील वर्षीपासून उपलब्ध करून दिली आहे. क्रीडा संचालनालयाच्या अधिकृत संकेत स्थळावर (https: //spot.mahaasht gov in) आपले सरकार पोर्टलची लिंक ग्रेस मार्क या टॅब अतर्गत उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र खेळाडू विद्यार्थ्यांना सदर पोर्टलवर जाऊन आपला अर्ज सादर करावा. अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे सवलत गुण मिळविण्याकरीता अर्ज करताना खेळाडू विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे परीक्षा बैठक क्रमांक, फॉर्म नं १ व २, बारावी साठी अर्ज करीत असल्यास इयत्ता दहावीचे गुणपत्रक, क्रीडा प्रमाणपत्र ज्या खेळाच्या आधारे सवलतीचे गुण हवे आहेत. त्या खेळाचे अधिकृत जिल्हास्तरीय, विभागस्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

## अक्षय कर्डिले यांच्या पाठपुराव्याला यश;

### रस्त्यांसाठी अर्थसंकल्पात २५ कोटींची तरतूद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी:** राज्याच्या नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पात राहुरी मतदारसंघातील विविध रस्त्यांच्या कामांसाठी तब्बल २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. युवा नेते अक्षय कर्डिले यांनी या कामांसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अर्थसंकल्पात या निधीची तरतूद केल्याची माहिती कर्डिले यांनी दिली. कामांना मंजुरी मिळाल्याबद्दल अक्षय कर्डिले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील



यांचे आभार मानले आहेत.

यावेळी कर्डिले म्हणाले की, मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे मतदारसंघातील अनेक रस्त्यांची दुरवस्था झाली होती. त्यावेळी स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी खासदार सुजय विखे पाटील तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे या रस्त्यांसाठी निधीची मागणी केली होती.

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अनेक गावांतील रस्त्यांना जनसुविधा, नागरी सुविधा आणि ३०-५४ योजनेअंतर्गत निधी मिळाला असला तरी काही प्रमुख रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली होती. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याने पालकमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे या रस्त्यांसाठी निधीची मागणी करण्यात आली होती.या मागणीची दखल घेत अर्थसंकल्पात निधी मंजूर झाल्यामुळे आता या रस्त्यांच्या कामांना वेग मिळणार असल्याचा विश्वास कर्डिले यांनी व्यक्त केला.

## अक्षय कर्डिले यांच्या विषयी आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी विधानसभा मतदारसंघातील संभाव्य पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाकडून युवा नेते अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनाच उमेदवारी द्यावी, अशी ठाम मागणी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली आहे. अन्य कोणाला उमेदवारी दिल्यास कार्यकर्ते सामूहिक राजीनामे देतील, असा इशाराही बैठकीत देण्यात आला. तसेच काही संभाव्य पक्षप्रवेशाच्या चर्चांमुळे कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याचेही या वेळी सांगण्यात आले.



राहुरीत तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. या बैठकीत दिवंगत आ शिवाजीराव कर्डिले यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांच्या वारशाचा सन्मान राखण्यासाठी अक्षय कर्डिले यांनाच आगामी पोटनिवडणुकीत उमेदवारी द्यावी व त्यांना विजयी करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला कर्डिले कुटुंबाने राहुरी मतदारसंघाच्या विकासासाठी सातत्याने योगदान दिले असून स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्याबद्दल भावनिक नाते असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी स्थानिक भावना आणि कार्यकर्त्यांची भूमिका लक्षात घेऊन उमेदवारीचा निर्णय घ्यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली कार्यकर्त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, अक्षय कर्डिले यांच्याशिवाय इतर कोणालाही उमेदवारी दिल्यास कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होईल. अशा परिस्थितीत अनेक कार्यकर्ते सामूहिक राजीनामे देण्याचा मार्ग स्वीकारतील, असा इशारा बैठकीत देण्यात आला.दरम्यान, या संदर्भात जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची लोणी येथे भेट घेण्यासाठी राहुरी तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ जाणार आहे. कार्यकर्त्यांच्या भावना पक्षश्रेष्ठींपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांना निवेदन देण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

### रमजानुल मुबारक २०२६
### रोजा नंबर १८

## बुरखा - पडदा - हिजाब - महिलांची सुरक्षा

काल( ०८) आठ मार्च हा जागतिक महिला दिवस म्हणून जगभर साजरा करण्यात आला. लाडक्या बहिणीच्या सुरक्षित राहावे म्हणून.


दिव्य कुरआन सांगितले , '' पैगंबर ! आपल्या पत्नींनां , व मुलींना आणि श्रध्दावंत स्त्रियांनाही सांगां , ( सार्वजनिक ठिकाणी वावरताना) की, त्यांनी बाह्य वस्त्राचा ( जींशॲ ऋऑशपींी,चादर ) भाग आपल्या अंगाभोवती ( अगांवर ) स्वतः वर ( म्हणजे डोक्यावर , अंगावर) टाकून घ्यावा . आशा पेहरावामुळे त्या ( शालीन स्त्रियां म्हणून )ओळखल्या जातील , आणि ( सार्वजनिक ठिकाणी वावरताना) त्यांना काही त्रास होणार नाही.. आणि अल्लाह फार क्षमाशील व दयाळू आहे . ( पारा नंबर २२ वा सुरह नं . ३३ अल-अहजाब आ.नं. ५९ वी ). महिलांबाबत, निकाह ( विवाह) , तलाक ( घटस्फोट), विधवा, खुला , बुरखा- पडदा - हिजाब व लग्नानंतर वारसा हक्क असें बरेच विषय सार्वजनिक ठिकाणी कायमस्वरूपी चर्चेत असतात , परंतु मुस्लिम समाजातील काही विषय हे शोशल मेडीयावर जास्तच चर्चेचे असतात.व मीडिया वाले जाणूनबुजून हें विषय चघळत असतात. अशा सर्व विषयांवरील समाज मनात पेरलेले खूप काही गैरसमज वर विस्तृत लिखाण करण्याची गरज आहेत, परंतु एका लेखात पुर्ण होवू शकत नाहीत. असो.जगात कोणत्या महीलेने काय वस्त्र परिधान करायचं हे प्रत्येक बधिनींना स्वातंत्र्य दिले आहे व तो ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे व तो प्रत्येक भगिनींचा अधिकार आहेत आणि अधिकार त्यांना संविधानाने दिलेला आहेत. पवित्र कुर आन मध्ये, '' पडद्या ''( हिजाब - किंवा बुरखा ) विषयी ज्या सद्यनेचा वापर केला जातो तो '' हिजाब '' आहे. हा शब्द पवित्र कुर आन मध्ये आठ (८)वेळा वापरला गेला आहेत. उदा. (१) सुरह अल - आराफ -, ४६,(२) सुरह बनी - इस्राईल आ. ४५(३) अल - मरियम आ. १७.(४)अल - आजहाब आ. ५३,(५)सुरह स्वाद आ. ३२,(६) सुरह अश - शुरा आ. ५१, (७) अल - मुत्तपफीफीन आ. १५, )(८)सुरहा अल - नूर आ. ३०.. असं आठ वेळा उल्लेख आलेला आहे., हिजाब '' चा शाब्दिक अर्थ'' पडदा ''विभाजक '' किंवा ''स्क्रीन '' असा आहे.'' हिजाब '' चा ज्या अर्थाने पारंपरिक स्वरूपात वापर केला जातो आणि जो मुस्लिम समाजात वापरला जातो तो कपड्याचा एक तुकडा डोक्यापासून पाया पर्यंत सैल पोषाक जो संपूर्ण शरीर झाकतो. त्याला'' बुरखा ''म्हटलं जातं, मध्यपूर्वेत याला '' नकाब '' म्हटलं जातं, इराण देशात संपूर्ण शरीराला झाकणारी काळी चादर असते आणि अरब देशात जो पडदा मुस्लिम भगिनी वापरतात त्याला '' आबाया '' असं म्हणतात. जगाच्या इतर देशामध्ये त्याला '' स्कार्फ '' म्हटले जाते ज्या डरे मुस्लिम भगिनी आपलं डोके झाकून घेतात.प्रेषित मुहम्मद स्व सल्लमांच्या काळापासून महीलांनी आपल्या कपड्यांच्या वर एक वस्त्र परिधान करावयास सांगितले आहे त्याला बुरखा - हिजाब - चादर- पडदा - म्हटले जातं, चादर ओढण्याची सांगितले आहे..त्यात डोक्यावर दुपट्टा ओढनी व संपूर्ण अंगाला चादर ओढणी किंवा शिवन घेतलेल्या बुरखा- हिजाब पांघरूण घेणे ..( दिव्य कुर आन मधील पारा नं. २२ अल - अजहाब आ नं ५९) मधे स्पष्ट शब्दांत आलेलं आहे.



महिलांनी सार्वजनिक ठिकाणी जाताना वावरताना घालण्याचं सांगितले आहे..१५०० वर्षापुर्वी चा काळ अज्ञानाचा काळ होता त्यावेळी स्त्रिया फक्त भोग विलासी साठी व अश्लिल कृत्यं, नाच- गाणं आणि फक्त मनोरंजनाचं साधनं येवढ्या पुरत्याच मर्यादित जीवन स्त्रियांचं होते. स्त्रियांकडे वाईट नजरेतुनच बघितले जायचं, त्याच प्रमाणे आजची परिस्थिती ही शोशल मेडीया च्या जमाण्यातील आहे .. परिस्थिती दिवसेंदिवस खूप गंभीर होत चालली आहे.. शोशल मेडीयामुळे लहान लहान मुलांना ही अश्लिल चाळे करताना दिसत आहेत.. बाकीचे सांगणं कठीणच. हे सर्व टाळण्यासाठी त्या काळातच प्रेषित मुहम्मद स्व.च्या मार्फत अल्लाहा( ईश्वर) नेच बधिंनी महीलांसाठी संरक्षण कवच म्हणून चादर -ओढनी- बुरखा- हिजाब चं संकल्पना सक्तीची सांगितली ..प्रेषित मुहम्मद स्व सल्लमांच्या विविध पत्नी हीं होत्या, हजरत जैनब रजि., हजरत रूकयया रजि., हजरत उम्मे कुलसूम रजि., हजरत फातिमा रजि., चार मुली होत्यां. त्याच बरोबर त्यांनी आपल्या परीवारांसह सर्व सहकारी मित्रांना ही सक्तीचं केले .विशेष बाब म्हणजे, पुरुषांसाठी सुद्धा आचारसंहिता लागू केली होती व ती सक्तीची मनाई केली , प्रेषित मुहम्मद स्व.च्या डरे दिव्य कुरआन मध्ये सांगतात की, '' दिव्य कुरआन सक्ती नें सांगतो की, '' हे पैगंबर (स्व.)! श्रद्धावान ( बंधुंना) पुरुषांना सांगा , की त्यांनी आपली दृष्टीं ( नजरां) ची जपनूक करावी ( नजरा खाली ठेवाव्यात ), आणि आपल्या लज्जा स्थानांचे रक्षण करावेत . असे करणे त्यांच्या साठी शुध्द चारीत्र्याचे द्योतक ठरेल , ते ( पुरुष) जे काही करतात अल्लाहाला त्यांचीं पुर्ण जाणीव(खबर)आहे. '' ( सुरहा आत - नूर आ. नं. ३० ). खरं तर या आदेशाचा अर्थ सदैव खाली पाहणं न होता पुरुषांनी स्त्रियां कडे चुकीच्या दृष्टीकोनातून न पाहणे . स्त्रियांच्या गुप्त अंगावर जाणूनबुजून दृष्टी न टाकणं. म्हणूनच प्रेषित मुहम्मद स्व सल्लम. सांगतात की चालता फिरताना आपली दृष्टी खाली ठेवून व आपल्या शरिराचे अंग प्रदर्शन स्त्रियांना ही होणार नाही याची काळजी पुरुषांना ही घेण्याची सक्ती करण्यात आली आहे. फक्त स्त्रियांसाठी सक्ती केली नव्हती तर तोच कायदा पुरुषांना ही सक्ती चा केला होता.प्रेषित मुहम्मद स्व सल्लम. '' महिलांनी आपल्या घरात मोकळेपणाने व थाटात वावरावे , नटून थटून सजून आपल्या सौंदर्याचे सर्वत्र प्रदर्शन करून फिरू नयेत , घराबाहेर जाताना डोक्याव चादर घेउन , जो दागिने घातलेली आहे त्या दागिन्यांचां मधुर नाद( खुळ खुळ) आवाज होत असेल तर तो काढुन ठेवावेत .''. ''घरातील पती, वडील ,भाउ, मुलगा, भाचा , पुतण्या ( यांच्या शी विवाह होत नाही)सोडून ; ईतर सदस्यांसमोर वावरताना विशेष खबरदारी बाळगावी . साज शृंगार नटने- सजने फक्त पतींसाठीच ..घरातील इतर अपत्यजनांसमोर समोर जाताना वावरताना सुध्दा आपल्या वक्षस्थांवर ओढनी- दुपट्टा पांघरूण अपले संपूर्ण शरीर आच्छादित होईल असे वस्त्र धारण करावेत ''.पुरुषांना खास आदेश देण्यात आले आहेत की , '' त्यांनी आपल्या आया बहीणींच्यां खोलींत जाताना परवानगी घ्यावी जेणेकरून अचानक तुमच्या घरात प्रवेशाने बेसावध बसलेल्या महीला,बहीणींवर खजिल होण्याची पाळी येणार नाहीत.''या सर्वाला परदा बुरखा पध्दत म्हणतात यावर अधिक खुलासा करताना प्रेषित मुहम्मद स्व सल्लमांनीं सांगितले की, '' स्त्रियांनों ,( महिलांनों ) आपल्या सख्ख्या भावा व वडीलांसमोर जाताना सुध्दा चेहरा हाताचा पंजा ,व घोट्याच्या पर्यंत पाया व्यतिरिक्त संपूर्ण शरीर वस्त्राने अच्छादित करूनच जावे , पारदर्शक, शरिर प्रदर्शन घडेल असे कपडे टाळावेत .., तसेच आपल्या घरातील आप्त जनां ( मेहरम) सोडून इतर कोणत्याही नात्याच्या पुरुषासमोर एकांतात बसू नये ' .पैगंबरांनी स्त्रियांना सुगंध अत्तर वगैरे लावून घराबाहेर जाण्याबाबत मनाई केली आहेत , मस्जिद मध्ये हीं महिला जाऊ शकतात त्यावर परवानगी देतांना महीलांना नमाज अदा करण्यासाठी वेगळ्या जागेची व्यवस्था करण्याचे आदेश दिले होते. एकाच रांगेत स्त्रियांना व पुरुषांना नमाज अदा करण्यास नाकारण्यात आले होते . त्याकाळात पैगंबर मुहम्मद स्व. हें स्वतः महिलांची संपुर्ण नमाज अदा झाल्यानंतर सर्व महीला मस्जिदी मधून निघून जाई पर्यंत पैगंबर स्व . त्यांचे पुरुष मित्र आपल्या बसल्या जागेवरून हालत नव्हते.इस्लाम ने महीलांना संपूर्ण सवलत व सुट होती व त्या खास देण्यात आल्या होत्या . प्रत्येक गोस्ट महीलांसाठी सोयीची व कामाचीच करून ठेवली. महीलांना प्रत्येक क्षेत्रात वाव देण्यासाठी प्रयत्न केले. परंतु त्या सर्व सवलती सूट ह्या त्यांच्या चौकटीत राहूनच पाळायाच्या, घरात बंदिस्त नव्हत्या. त्या काळात, महिलांना युद्धात भाग घेण्यासाठी हीं परवानगी होती, महिलांना युद्धात जखमी सैनिकांची सेवा, निगा नर्सिंग करण्याचे कामं दिली जात होती. पैगंबर मुहम्मद स्व. यांच्या मस्जिद ए नबीवी मध्ये आपले प्रश्न गाऱ्हाणं स्वतः मांडीत असें.. एवढी मोकळीक होती.सध्या शोशल मेडीयाच्या जमाण्यात यू ट्यूब ,वेब सिनेमा व सिरीयलस चालू आहेत, प्रत्यक्षात त्यामध्ये जाणते - अजनाते नक्कीच काय ते सांगू शकत नाहीत परंतु एखादे दृश्य अश्लिल टाकतातच, फार थोड्या सिरीयल असें असू शकतात की त्यामधे अश्लील दृश्य नसतात, परंतु बहुतेक सिनेमा , सिरीयलस जाहीरातीत महिलांचां वापर करून कमी कपड्यात - अंग प्रदर्शन केले जात आहे.. कमी फिट्ट व पारदर्शक कपड्यात स्त्रियांना जाणूनबुजून दाखवले जातात , त्यामुळे लहान लहान मुलां वर विपीरीत परीणाम होउन अश्लील दृश्यांची बळी पडून नको ते ते कृत्य मुलं करतांना बघावं लागतं किंवा वारंवार दैनिक न्यूज हेडलाईन आज काल बघायला मिळतात.. त्यांच्या बालमनांवर अदृश्य पणे मानसिक परिणाम होउन चुकीचे कृत्य नकळत पणे होऊन त्यातूनच काही नराधमांच्या संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. अनेक गुन्हेगारांना आपसूक आमंत्रण भेटत आहेत. हजारो गुन्हे हें यामुळेच होतं आहेत, महिला हा विषय संवेदनशील असल्यामुळे अगदीच यासाठी ओढणी पडदा- बुरखा -हिजाब ही काळाची गरज बनत चालली आहेत, प्रश्न फक्त एका समाजापुरताच मर्यादित राहिला नाही, तर हा प्रश्न सर्वसामान्य समाजातील लोकांना भेडसावत आहेत. सर्वांच्या मुली लाडक्याच असतात . आपल्या मुलीं या सुरक्षित राहावेत असं प्रत्येक पालकांची मनोमन इच्छा असते , यासाठी सुरक्षित पध्दत हिजाब -बुरखा - पडदा किंवा दुसऱ्या भाषेत त्याला काही ही नावे द्यावीत हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे.

बुरखा - पडदा हिजाब हें आजच्या काळाच्या लाडक्या बहिनीं च्या सुरक्षासाठी काळाची गरज बनली आहेत.

वाद नको..... बघा समजलं तर..



**डॉ. सलीम शेख**
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# नागरिकांच्या सुरक्षेसाठी संगमनेर नगरपरिषदेचे 'रक्षक दल' कार्यान्वित

## महाराष्ट्रातील पहिली संकल्पना



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : शहरातील महिला, मुली व नागरिकांच्या तात्काळ सुरक्षेसाठी संगमनेर नगरपरिषदेच्या पुढाकारातून 'रक्षक दल' ही अभिनव संकल्पना कार्यान्वित करण्यात आली. आ. सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा शुभारंभ जागतिक महिला दिनानिमित्त सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे करण्यात आला. महाराष्ट्रात प्रथमच नगरपरिषदेच्या स्तरावर अशा प्रकारचे रक्षक दल स्थापन करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

या कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, शहर काँग्रेस अध्यक्ष सोमेश्वर दिवटे, माजी नगराध्यक्ष विश्वासराव मुर्तडक यांच्यासह विविध मान्यवर, अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. शहरातील नागरिकांना तात्काळ सुरक्षा मिळावी यासाठी या रक्षक दलाची स्थापना करण्यात आली असून कुठल्याही अनुचित घटनेच्या वेळी ९०६७२७३२७३ या क्रमांकावर संपर्क साधल्यास रक्षक दल तत्काळ घटनास्थळी पोहोचणार आहे.

आयडीबीआय बँकेच्या वतीने नगरपरिषदेला चारचाकी वाहन व दोन बुलेट मोटारसायकली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यावेळी आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, महिलांचा सन्मान व नागरिकांची सुरक्षा ही सर्वांची जबाबदारी आहे. पोलीस यंत्रणेसोबत हे रक्षक दलही त्वरित मदतीसाठी सज्ज राहील. नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे यांनीही नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत हा अभिनव उपक्रम राबविल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरोजना पगडाल यांनी केले, तर आभार सीमा खटाटे यांनी मानले. या कार्यक्रमाला शहरातील नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### रक्षक दलाची शहरातून भव्य रॅली

जागतिक महिला दिनानिमित्त स्थापन करण्यात आलेल्या रक्षक दलाची शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे यांनी स्वतः सुरक्षा रक्षक वाहन चालवत रॅलीचे नेतृत्व केले. चारचाकी वाहन व दोन बुलेट मोटारसायकलींसह निघालेल्या या रॅलीचे संगमनेर शहरात सर्वत्र स्वागत करण्यात आले.

## द•ख•ल

### कडक उन्हामुळे परिसरातील जनजीवन विस्कळीत



**पुणतांबा** : परिसरात गेल्या चार - पाच दिवसापासून कडक उन्हाळ्याची सुरुवात झाल्यामुळे परिसरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवडयात उन्हाळ्याची एवढी दाहकता असेल तर उर्वरित मार्च, एप्रिल, मे व जून महिन्यात किती तीव्रता असेल याबाबत अंदाज करणे कठिण असेल असे ग्रामस्थांचे व शेतकरी वर्गाचे मत आहे. विशेष म्हणजे कडक उन्हाळ्यामुळे व रब्बी पिकांच्या पाणी भरण्यासाठी शेवटचे पाणी असल्यामुळे शेतकरी वर्गात पाणी भरण्यासाठी लगबग सुरू आहे मात्र पाण्याच्या उपसा वाढल्यामुळे परिसरात विहीरीच्या पाण्याच्या पातळीत वेगाने घट होत आहे. तसेच बंधारे कोरडे पडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे मार्चनंतर परिसरात पाणीटंचाई जाणवू शकते असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### एच पी व्ही लसीकरण अंतर्गत पालक विद्यार्थिनीमध्ये जनजागृती



**वडाळा महादेव** : श्रीरामपुर तालुक्यातील उंदिरगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व भास्करराव गलांडे पाटील विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनी व पालक यांचे मध्ये जनजागृती करण्यात आली एचपीव्ही लसीकरणाबाबत माहिती देण्यात आली. सदर चर्चासत्र तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. उंदीरगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील राजगुरू यांनी उपस्थित विद्यार्थिनी व पालकांना एच पी व्ही लसीकरणाबाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजेंद्र कदम हे होते. यावेळी प्रशांत गायकवाड, शैला लोखंडे, प्रतिभा वाघमारे, मनिषा फुलवर, अनिता सरोदे, भास्कर गलांडे, विद्यालयाचे शिक्षक व पालक संजय मोरे, शकुंतला खंगारे, सिंधुबाई रोकडे आदी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठात

# देशातील पहिले 'बायोहॅपीनेस सेंटर' सुरु

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी देशातील पहिले 'बायोहॅपीनेस सेंटर' सुरू करण्यात आले. या कार्यक्रमात चेन्नई येथील एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा जागतिक आरोग्य संघटनेच्या माजी मुख्य वैज्ञानिक डॉ. सौम्या स्वामीनाथन यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. डॉ. स्वामीनाथन म्हणाल्या की, भारतातील अन्न व उत्पादन संस्कृतीत महिलांचे मोठे योगदान आहे.

ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढत असल्याने शेतीमध्ये मजुरांची टंचाई भासत आहे. त्यामुळे महिलांना आधुनिक तंत्रज्ञान व इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून दिल्यास स्मार्टफोनच्या माध्यमातून शेती अधिक सुलभ होईल आणि त्या अधिक सक्षमपणे शेती करू शकतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. त्यांनी सांगितले की, महिलांचे शेतीमध्ये मोठे योगदान असून विद्यापीठाने विकसित केलेल्या एकात्मिक शेती पद्धतीमुळे अनेक गावांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. 'फुले समृद्ध व्हिलेज' ही संकल्पना लवकरच दहा जिल्ह्यांतील दहा गावांमध्ये राबविण्यात येणार आहे.

या प्रसंगी 'फुले समृद्ध व्हिलेज' तसेच 'फुले पोकरा संजीवनी व्हिलेज' अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र येथे 'बायोहॅपीनेस सेंटर'चे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास शास्त्रज्ञ, प्राध्यापक, अधिकारी, विद्यार्थी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राहुरी नगरपरिषदेच्या माध्यमातून विकासकामांना प्रशासकीय मंजुरी





**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी नगरपरिषदेची सत्ता पटकावून तनपुरे गटाच्या उमेदवारांनी घवघवीत यश संपादन केल्याने विकास आघाडी सत्तेत आल्यानंतर माजीमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध विकासकामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून अनेक कामे प्रगतीपथावर असल्याची माहिती नगराध्यक्षभाऊसाहेब मोरे व विकास आघाडीचे गटनेते हर्ष तनपुरे यांनी माध्यमांना दिली आहे. राहुरी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत सुमारे २.५० कोटींच्या विविध विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. तसेच मुळा धरणाच्या पाण्याच्या टाकी परिसरात वीज बचतीसाठी सुमारे १ कोटी रुपयांच्या सोलर पॉवर प्रकल्पासाठी ऑर्डर देण्यात आली आहे.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत राजश्री हॉटेलमागील रस्ता, सरोदे वस्ती ते काळे आखाडा रस्ता, राहुरी कॉलेजमागील रस्ता ते दिनकर पवार यांच्या घरापर्यंतचा रस्ता, केशर मंगल कार्यालय कॉर्नर ते धावडे प्लॉट ओपन स्पेसपर्यंतचा रस्ता आदी ठिकाणी डांबरीकरणाची कामे करण्यात येणार आहेत. तसेचप्रकाश अरगडे घर ते शिंदे सर घर आणि अनिल कोळसे यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण, नगरपरिषद हद्दीतील नावघाट येथील सुधारणा व खंडोबा मळा येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येणार आहे.

याशिवाय दलितेत्तर वस्ती सुधार योजनेंतर्गत येवले आखाडा येथील अमरधाम ते सुधाकर मुरली जाधव वस्तीपर्यंत रस्ता खडीकरण, मुलूनमाथा येथील अंगणवाडीस कंपाउंड बांधणे, डौले वस्ती ते काळे आखाडा पुलापर्यंत रस्ता खडीकरण, कानिफनाथ चौक ते क्रांती चौक रस्ता खडीकरण अशी कामे प्रस्तावित आहेत. तसेच नूतन मराठी शाळा, तांदुळवाडी येथे शौचालय बांधकाम व अन्य विकासकामे, पुरुषोत्तम नगर येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण, येवलेआखाडा येथील अमरधाम ते रवी येवले वस्तीपर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण आणि तनपुरे खळवाडी येथील उर्वरित रस्त्याचे कॉंक्रिटीकरण अशी विविध कामे मंजूर करण्यात आली आहेत. या दरम्यान प्रधानमंत्री आवास योजना २.० (इडउ घटक) अंतर्गत नगरपरिषद हद्दीतील एकूण १५५ घरकुलांना मंजुरी मिळाली असून नगराध्यक्ष व गटनेते यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे ही घरे मंजूर झाल्याचे सांगण्यात आले.

ही योजना सुरू असून राहिलेल्या इच्छुक लाभार्थ्यांनी राहुरी नगरपरिषदेत संपर्क साधून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. याबरोबर लवकरच नगरपरिषद हद्दीतील सर्व प्रमुख रस्त्यांची कामे हाती घेण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, गटनेते हर्ष तनपुरे व विकास आघाडीच्या नगरसेवकांनी दिली आहे.

# 'महाराजस्व' शिबिराने कारेगावकरांचे झाले 'समाधान'




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'गतिमान प्रशासन' मोहिमेंतर्गत कारेगाव येथे शनिवारी (दि. ७) 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' उत्साहात पार पडले. विविध शासकीय विभागांच्या सहभागामुळे नागरिकांची अनेक प्रलंबित कामे एकाच ठिकाणी मार्गी लागली. शिबिराचे उद्घाटन पंचायत समितीचे माजी सभापती दीपक पटारे व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी विविध विभागांचे अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरात महसूल, पुरवठा, आरोग्य तसेच सेतू सुविधा केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना तात्काळ सेवा देण्यात आल्या. महसूल विभागाने ४१ पोटखराबा लाभार्थी, सातबारा दुरुस्ती प्रकरणे व फेरफार नोंदी निकाली काढल्या. समाजकल्याण विभागामार्फत २६ दिव्यांग लाभार्थ्यांना युडीआयडी कार्ड, हयात प्रमाणपत्रे तसेच नवीन अर्जांची छाननी करण्यात आली. आरोग्य विभागाकडून १०७ ग्रामस्थांची बीपी, शुगर व ईसीजी तपासणी मोफत करण्यात आली. या शिबिरासाठी सुमारे शेकडो नागरिकांनी उपस्थिती लावली होती.

शिबिराच्या आयोजनासाठी पुरवठा निरीक्षक राजेंद्र शिंदे, प्र. निवासी नायब तहसीलदार अभया राजवाळ, मंडळ अधिकारी भाग्यश्री शिंदे, सहायक महसूल अधिकारी उमेश मुतगेकर, इंजिनियर राजेश कवाने, तलाठी ऋषिकेश कदम, रमाकांत हरेर, गणेश शिंदे, अजय साळवे, सायली अमोलिक, राहुल साठे, महसूल सेवक यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. सुजय विखे यांचा निमगाव ग्रामस्थांकडून सन्मान



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : भारतीय जनता पार्टीने विखे परिवाराला राज्य पातळीवर काम करण्याची संधी दिली असून डॉक्टर सुजय विखे यांना भाजपच्या प्रदेश कार्यकारणी स्थान दे उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राहता तालुक्यातील निमगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन मजबूत करण्याचा स्पष्ट संदेश देण्यात आला असूनही नगर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. विधानसभा, नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांदरम्यान त्यांनी केलेल्या संघटनात्मक कामाची आणि पक्षविस्तारासाठी घेतलेल्या मेहनतीची दखल या निवडीमधून घेतले गेल्या ने अहिल्या नगर जिल्ह्याचा मान वाढल्याने. निमगाव चे सरपंच कैलास कातोरे, रिपाइं नेते चांगदेव जगताप, ग्रामपंचायत सदस्य शितल जगताप, गणेश कातोरे आदिंनी पुष्प गुच्छ देत शुभेच्छा दिल्या.

नगर जिल्ह्यातून थेट राज्य संघटनेत एवढ्या उच्च पदावर वर्णी लागण्याची ही पहिलीच वेळ असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. स्वतः डॉ. विखे पाटील यांनीही या जबाबदारीला संधी मानत राज्यभर पक्षवाढीसाठी अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. २०२९ च्या निवडणुकांवर लक्ष भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने या नव्या कार्यकारिणीला मान्यता देताना २०२९ मधील लोकसभा आणि विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

संघटनात्मक बळकटी, नव्या नेतृत्वाला वाव आणि विविध सामाजिक घटकांपर्यंत पोहोच वाढवणे या उद्दिष्टांवर भर देण्यात आला आहे. नव्या चेहऱ्यांना दिलेली संधी ही आगामी राजकीय रणनीतीचा भाग मानली जात आहे.

# देवळाली प्रवराचे सुपुत्र राजेंद्र आजबे यांची 'ऑनररी कॅप्टन' पदी पदोन्नती



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : येथील शेटेवाडी येथील रहिवासी व मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटल ट्रेनिंग सेंटरचे प्रशिक्षक सूबेदार (ऑनररी लेफ्टनंट) राजेंद्र हरिभाऊ आजबे यांना भारताचे राष्ट्रपती यांच्या हस्ते 'ऑनररी कॅप्टन' या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

राजेंद्र हरिभाऊ आजबे यांचे प्राथमिक शिक्षण शेटेवाडी येथे पूर्ण केले. माध्यमिक शिक्षण देवळाली प्रवरा येथील छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च महाविद्यालयात घेतले, तर उच्च शिक्षण राहुरी कॉलेज पूर्ण केले. आजबे यांनी २८ जून १९९६ रोजी मराठा लाईट इन्फंट्रीमध्ये भरती होऊन देशसेवेची सुरुवात केली. तब्बल २९ वर्षांच्या सेवाकाळात त्यांनी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. देशासाठी लढलेल्या कारगिल युद्धातही त्यांनी सहभाग घेतला होता. तसेच संयुक्त राष्ट्रांच्या दक्षिण सुदान येथील शांतता मोहिमेतही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सेवेबरोबरच क्रीडा क्षेत्रातही त्यांची विशेष कामगिरी आहे.

बॉक्सिंग, कुस्ती, पोहणे आणि नेमबाजी या खेळांमध्ये त्यांनी उल्लेखनीय प्रावीण्य मिळवले आहे. त्यांच्या या कर्तृत्वाचा गौरव म्हणून भारताचे राष्ट्रपती यांनी त्यांना 'ऑनररी कॅप्टन' या पदावर पदोन्नती दिली आहे.

# योगागुरु रिमा गोसावी यांना 'स्त्री नारीशक्ती' पुरस्कार

## ५० आदर्श महिलांचा सन्मान



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** : स्त्रीपुरुष समानता, आर्थिक समता, सुरक्षित वातावरण, स्वातंत्र्य आणि कौटुंबिक स्वास्थ ही पंचसूत्रे महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत. अशा मूल्यांवर कार्य करणाऱ्या योगागुरु रिमाताई गोसावी यांना 'स्त्री नारीशक्ती' पुरस्कार मिळणे अत्यंत प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन बेलापूर येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. गुंफाताई कोकाटे यांनी केले.

श्रीरामपूर येथील आगाशे सभागृहात विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात योगागुरु रिमाताई रमेश गोसावी यांना स्व. सौ. पुष्पा सुखदेव सुकळे स्मृती प्रीत्यर्थ राज्यस्तरीय 'स्त्री नारीशक्ती' पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ५० आदर्श महिलांचाही सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य टी. ई. शेळके होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने झाली. प्रतिष्ठानचे संस्थापक व सचिव सुखदेव सुकळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर पाहुण्यांचा परिचय उपाध्यक्ष डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी करून दिला. मानपत्राचे वाचन प्रा. डॉ. शरद दुधाट यांनी केले.

यावेळी कवयित्री चंद्रकला आरगडे, प्राचार्य सुमतीताई औताडे, गीतांजली गाढे, डॉ. संजय दुशिंग आणि दत्तात्रय रायपल्ली यांनी मनोगत व्यक्त केले. पुरस्कार स्विकारताना योगागुरु रिमाताई गोसावी यांनी विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक करत महिलांनी आरोग्यदायी आणि सांस्कृतिक जीवन जगण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शरद दुधाट यांनी केले, तर आभार डॉ. शिवाजी काळे यांनी मानले.

# अमृतवाहिनी बँकेच्या वतीने महिला दिनानिमित्त शून्य बॅलन्स खाते




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते तथा मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी बँकेने ११०० कोटींचा टप्पा गार केला असून जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने तालुक्यातील महिला भगिनींचे शून्य बॅलन्स वर खाते उघडण्यात येणार असून एटीएम वर दोन लाखांचा विमा दिला जाणार आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित एकविरा फाउंडेशनच्या क्रिकेट स्पर्धेत अमृतवाहिनी बँकेने महिलांसाठी ही विशेष योजना सुरू केली आहे. यावेळी मा. शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात, मा.आ.डॉ.सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात, व्हाईस चेअरमन नानासाहेब शिंदे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, मा.जि.प.सदस्य रामहरी कातोरे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे महिलांसाठी क्रिकेट रस्सीखेच व बॅडमिंटन स्पर्धे चे आयोजन करण्यात आला असून या स्पर्धांमधून ४५०० महिला व युवतीने सहभाग घेतला आहे.

तालुक्यातील महिला व युवतीने विविध क्षेत्रात मोठी प्रगती केली असून हे सर्वांसाठी अभिमानास्पद असल्याचे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले असून महिला दिनाच्या निमित्ताने अमृतवाहिनी बँकेच्या वतीने शून्य बॅलन्स वर महिलांचे खाते उघडण्यात येणार असून एटीएम वर दोन लाखांचा विमा असणार आहे. यासाठी प्रत्येक महिलेने आपले आधार कार्ड, पॅन कार्ड व दोन फोटो घेऊन एकविराच्या सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात स्टेडियम मध्ये उभारण्यात आलेल्या अमृतवाहिनी बँकेच्या स्टॉलमध्ये जमा करावे व बँकेचे खाते खोलावे असे आवाहन बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी यांनी केले आहे. यामुळे अनेक महिला भगिनींना शून्य दरामध्ये आपले खाते खोलता येणार असून एटीएम वर दोन लाखांच्या विम्याचा लाभ मिळणार आहे.

तरी या उपक्रमाचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन एकविरा फाउंडेशन व सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या वतीने करण्यात आली आहे.

# म्हैसगावात महसूल समाधान शिबिर; नागरिकांच्या तक्रारींचे निवारण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव** : तहसील कार्यालय राहुरी यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान अंतर्गत म्हैसगाव येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. सिंगल विंडो प्रणालीद्वारे नागरिकांच्या प्रलंबित महसूल तक्रारींचे १०० टक्के निवारण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या शिबिरात अर्ज स्वीकृती, कागदपत्रांची पडताळणी तसेच विविध सेवांचे तात्काळ वितरण करण्यात आले. श्रीरामपूरचे प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील यांच्या हस्ते विविध दाखले व कागदपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, प्रत्येक मंडळात अशा शिबिरांचे आयोजन करून नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. अभियानांतर्गत ताहाराबाद, बारागाव नांदूर, वांबोरी, टाकळीमिया, सात्रळ, ब्राम्हणी, देवळी (प्रवरा) आणि राहुरी या आठ मंडळांमध्ये शिबिरे आयोजित करण्यात आली असून ताहाराबाद मंडळाचे शिबिर म्हैसगाव येथे पार पडले. शिबिरात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना, जात व उत्पन्न दाखले, नवीन रेशनकार्ड, रेशनकार्डमध्ये नाव समावेश, पीएम किसान नोंदणी आदी विविध सेवा देण्यात आल्या. तसेच वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्याबाबत माहिती देण्यात आली.



## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा

क्रमांक/जन्म मृत्य एसआर/२०९/२०२५

नेवासा दिनांक २३/०२/२०२६

अर्जदार श्री श्रीम. वनिता रमेश राऊत रा. बेलपांढरी, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम/कु. कांताबाई बबन राऊत रा. बेलपांढरी याचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव- कांताबाई बबन राऊत, गावाचे नाव-बेलपांढरी, जन्म दिनांक-०१/०६/१९६५

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास सबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

## केवळ शिर्डीचा नाही, मी देशाचा खासदार..!

रोखठोक मते मांडली. पत्रकार परिषदेत बोलताना ते पुढे म्हणाले की, राज्यसभेवर तिसऱ्यांदा संधी मिळणारा मी एकमेव खासदार असून ही माझ्यासाठी आणि पक्षासाठी अभिमानाची गोष्ट आहे. मी भाजपच्या पाठिंब्यावर निवडून आलो असलो, तरी मी आरपीआयचाच उमेदवार आहे. महाराष्ट्रात पक्ष वाढवण्यासाठी आमचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. पुण्यात आमचे सहा नगरसेवक निवडून आले आहेत. आता अन्य दोन राज्यांत जर आमच्या पक्षाला यश मिळाले, तर आरपीआयला 'राष्ट्रीय पक्षा'ची मान्यता मिळेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा एकतेचा आणि संविधानाचा संदेश घेऊन मी देशभर काम करणार आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधताना आठवले म्हणाले की, राहुल गांधी यांनी आजवर केवळ जाती-जातीत भांडणे लावण्याचे आणि फूट पाडण्याचे काम केले आहे. आजही ते तेच राजकारण करत आहेत. याउलट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उद्देश केवळ देशाचा विकास करणे आणि सर्व जाती-धर्मांच्या लोकांना सोबत घेऊन जाणे हा आहे. राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आठवले यांनी आग्रही भूमिका मांडली. निवडणुका लांबणीवर पडल्याने कार्यकर्त्यांचे नुकसान होत आहे. या निवडणुका लवकरात लवकर घेऊन कार्यकर्त्यांना न्याय दिला पाहिजे. आरपीआयच्या कार्यकर्त्यांनी केवळ युतीवर अवलंबून न राहता स्वबळावर निवडून येण्याची जिद्द बाळगावी, असा सल्ला त्यांनी दिला. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे कौतुक करताना आठवले म्हणाले की, भारताचे अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांशी अत्यंत चांगले संबंध आहेत. नवीन व्यापार करारांमुळे भारतातील छोट्या व्यापाऱ्यांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध होईल. तसेच भारत सरकार 'एआय' (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानात जगाचे नेतृत्व करण्यास सज्ज आहे.

याप्रसंगी रिपाईचे प्रदेश उपाध्यक्ष विजयराव वाकचौरे, उत्तर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, राजाभाऊ कापसे, भिमा बागुल , आशिष शेळके, बाबा राजगुरु, माणिक यादव, गणेश कदम, कैलास शेजवळ, रमेश शिरकांडे , नानाभाऊ त्रिभुवन , जनार्दन साळवे, गणेश साळवे , राजेश गायकवाड , कैलास कासार यांच्यासह आरपीआयचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. साईबाबांच्या दर्शनानंतर आठवले यांचे विविध ठिकाणी स्वागत करण्यात आले.

## राज्यात १ लाख १५ हजार ५३० कोटींच्या नदीजोड प्रकल्पांना मान्यता

पश्चिम वाहिन्या नद्या आहेत. या नद्या सह्याद्री पर्वतरांगेत उगम पावतात आणि अरबी समुद्रात मिळतात. या खोऱ्यातील अतिरिक्त ५४ टीएमसी पाणी समुद्रात वाहून जाण्याऐवजी गोदावरी खोऱ्यात वळवण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे.

हे पाणी मराठवाड्यातील तुटीच्या भागात पोहोचवले जाईल, ज्यामुळे दुष्काळग्रस्त मराठवाड्याला मोठा दिलासा मिळेल. हा प्रकल्प मराठवाड्याच्या पाणीटंचाईवर दीर्घकालीन उपाय ठरेल. यामुळे शेतीला शाश्वत सिंचन, पिण्याचे पाणी आणि औद्योगिक गरजा पूर्ण होतील, असे विखे पाटील म्हणाले.

हे प्रकल्प पुढील २० वर्षांसाठी राज्यातील पाण्याची तरतूद सुनिश्चित करतील. मुख्यमंत्री फडणवीस यांनी याला महाराष्ट्राचा कायापालट करणारे पाऊल म्हटले आहे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील लाखो शेतकरी आणि नागरिकांना याचा थेट लाभ होईल. शासनाचे हे प्रयत्न दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने महत्त्वाचे ठरतील!

## सोलर पंपच्या नावाखाली ४० शेतकऱ्यांची फसवणूक, तिघांवर गुन्हा

माहितीनुसार, डिसेंबर २०२४ पासून सौर कृषी पंप योजनेसाठी सीएससी सेंटरमधून शेतकऱ्यांचे अर्ज भरले जात होते. यावेळी आरोपींनी स्वतः कडे सौर पंपाच्या पाच कंपन्यांची एजन्सी असल्याचे सांगून अर्ज त्यांच्या मार्फत दिल्यास लवकर मंजुरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी शासन शुल्क ११ हजार ३१३ रुपयांव्यतिरिक्त प्रत्येकी २ हजार रुपये अतिरिक्त घेण्यात आले. महावितरणकडून माहिती घेतली असता आरोपींनी इतर शेतकऱ्यांचे ग्राहक क्रमांक वापरून अर्ज भरल्याचे उघड झाले. त्यामुळे महावितरणने संबंधित सर्व अर्ज ब्लॉक केले आहेत. या प्रकरणी पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

## वरात निघाली जोरात...

डॉ. दिलीप टिपरसे यांनी शहर व उपनगरातील ३७ प्रमुख मंगल कार्यालयांचे चालक व ध्वनिक्षेपक यंत्रणेच्या मालकांना नियमांचे पालन करण्याचे व प्रदूषण अधिनियमांची उल्लंघन केल्यास कारवाईचा इशारा देणाऱ्या नोटिसा बजावल्या होत्या. आता पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. याशिवाय विवाह समारंभाच्या शहरातून निघणाऱ्या वरातीही वाहतुकीस अडथळा ठरत आहे. या संदर्भातही पोलिसांनी कारवाईचे पाऊल उचलावे, अशी नागरिकांमधून मागणी होत आहे. शहरात अनेक ठिकाणी सध्या रस्ते दुरुस्तीचे काम सुरू आहे. शहराचा मध्यवर्ती भाग गल्लीबोळांचा आहे. अशा रस्त्यावरून निघालेली मिरवणूक वाहतुकीला अडथळा ठरते आहे. वाहतूक व्यवस्था कोलमडते. मिरवणुकीमध्ये, रस्त्यावर ध्वनिक्षेपक यंत्रणेकडून नियमांचे उल्लंघन होते. कर्णकर्कश्य आवाजात दणदाणाट केला जातो. सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा कालावधी सुरू असल्याने पोलिसांनी अधिक कठोरपणे कारवाई करावी अशी मागणी होत आहे. रात्रीच्या वेळी भरचौकात धनिक्षेपक लावून वाढदिवसाच्या केक तलवारीने कापण्याचे प्रकारही वाढत आहेत. यावरही कारवाई करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

## भारतच विश्वविजेता..!

चोपून भारताला २५० च्या पार नेले. न्यूझीलंडकडून जेम्स नीशामने ३ विकेट्स घेतल्या, पण भारतीय फलंदाजांना रोखणे त्यांना शक्य झाले नाही. लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडला सुरुवातीपासूनच धक्के बसले. पॉवरप्ले आणि त्यानंतरच्या षटकांत जसप्रीत बुमराह, हार्दिक पंड्या, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल यांच्या भेदक माऱ्याने न्यूझीलंड पुरते गारद केले. न्यूझीलंडच्या टिम सिफर्टने ५२ धावा केल्या, पण इतर फलंदाज मोठी खेळी करू शकले नाहीत. डॅरिल मिचेल आणि कर्णधार मिचेल सँटनर यांना पुढे फार चांगली संधी मिळाली नाही. सामन्यादरम्यान अर्शदीप सिंह आणि डॅरिल मिचेल यांच्यात थोडा वाद झाला, पण सूर्यकुमार यादवने परिस्थिती शांत केली. टिम सिफर्टने अर्धशतक झळकावले, पण जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल (३ विकेट्स), वरुण चक्रवर्ती यांच्या भेदक माऱ्याने न्यूझीलंडला मोठे धक्के बसले. डॅरिल मिचेल (१२.५ व्या षटकात बाद) आणि मिचेल सँटनर (सध्या खेळत आहेत) यांनी थोडा प्रतिकार केला, पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. भारतीय गोलंदाजांनी जबरदस्त कामगिरी करत सामना आपल्या बाजूने वळवला.

## पतीचे विवाहबाह्य संबंध, छळामुळे डॉ. मनीषा जेजुरकर यांची आत्महत्या!

कलमांतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी प्राथमिक तपास सुरू केला असून, डॉ. निलेश जेजुरकर यांची चौकशी सुरू आहे. पोस्टमॉर्टम अहवाल आणि मोबाइल रेकॉर्ड्स तपासले जात आहेत. या प्रकरणाने नाशिकमध्ये खळबळ उडाली असून, वैद्यकीय वर्तुळातही चर्चा सुरू आहे.पोलिसांनी सांगितले की, तपास पूर्ण होईपर्यंत अधिक माहिती उघड केली जाणार नाही. कुटुंबीयांनी न्यायाची मागणी केली असून, प्रकरणाला वेगळे वळण लागले आहे.

# विकसित महाराष्ट्रासाठी नारीशक्तीचे योगदान महत्त्वाचे : राधाकृष्ण विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** विकसित महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नारीशक्तीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून, महिलांच्या प्रगतीसाठी महायुती सरकारने राबविलेल्या विविध योजनांचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक महिलेला मिळावा. यासाठी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली.

प्रवरानगर येथील डॉ. धनंजय गाडगीळ सभागृहात नागरिकांच्या भेटीसाठी आयोजित जनता दरबारात ते बोलत होते. जागतिक महिला दिनानिमित्त भेटीस आलेल्या महिलांना त्यांनी शुभेच्छा देत त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांतून आलेल्या नागरिकांच्या निवेदनांचा स्वीकार करून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



महिलांशी संवाद साधताना विखे म्हणाले की, राज्याच्या विकासात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रामीण व शहरी भागात सुरू असलेल्या बचत गट चळवळीमुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मोठी चालना मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात 'लाडकी बहीण' योजना सुरू ठेवण्याची घोषणा केली असून, अंगणवाडी सेविकांना आर्थिक नियोजनाचे प्रशिक्षण देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात आतापर्यंत २७ लाख 'लखपती दीदी' निर्माण झाल्या असून आगामी वर्षात आणखी २५ लाख महिलांना लखपती बनविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात १ लाख ८० हजार ४४४ महिलांना लखपती बनविण्याचे लक्ष्य असून त्यापैकी आतापर्यंत १ लाख ३७ हजार २३४ महिला लखपती झाल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ५२९ वी रँक मिळवत आयपीएस पदासाठी पात्र ठरलेल्या धनंजय संजय दिघे यांचा विखे पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विविध शासकीय विभागांशी संबंधित आलेल्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करून नागरिकांच्या समस्या प्रलंबित ठेवू नयेत, असे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

## जागतिक महिला दिनानिमित्त विद्यार्थ्यांना टिफिन व बॅग वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत सोनई येथील आदर्श विद्या मंदिर विद्यालयात हिंदुस्थान फीड्सच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना टिफिन डबा व शालेय बॅगचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून पहिली ते पाचवीतील तब्बल ८७० विद्यार्थ्यांना भेटवस्तू देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा आदर्श निर्माण करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेच्या अध्यक्षा जयश्री रविराज गडाख, सचिव रविराज तुकाराम गडाख, हिंदुस्थान फीड्सचे एरिया सेल्स मॅनेजर पांडुरंग सातपुते, सेल्स ऑफिसर नरसिंह कुलाडे तसेच ग्राहक सेवा अधिकारी किरण गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सोनई व परिसरातील सुमारे १५० अंगणवाडी सेविका व आशा सेविकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री हनुमान ग्रामीण विकास व संशोधन मंडळ, पानासवाडीचे सचिव रविराज गडाख होते, तर संस्थेच्या अध्यक्षा जयश्रीताई गडाख यांच्या हस्ते सेविकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक अनिल दरंदले यांनी प्रास्ताविकातून शाळेत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. यावेळी पांडुरंग सातपुते यांनी गाय व माय या विषयावर मार्गदर्शन करत पशुखाद्याच्या योग्य वापराबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन यश पशुखाद्यचे आदिनाथ घावटे, व्यंकटेश पशुखाद्यचे सोमनाथ बंग तसेच शिक्षक अशोक घावटे यांच्या नियोजनातून करण्यात आले. सूत्रसंचालन एम. बी. जाधव व व्ही.जी. कोंगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन दिपाली निमसे यांनी मानले.या कार्यक्रमास जिल्हा परिषद सोनई व खरवंडी गटातील अंगणवाडी सेविका, मदतनीस, शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**CHANGE Of Name**

I Have A Declare My Name Change My Old Name Shaikh Sarfaraz Shaikh Mukhtar Is On My School Living Certificate And My New Name Is Sarfaraz Mukhtar Shaikh As On Aadhar Card Number Is 4750 9522 4031

**Chenge Of Name**

I Have A Declare My Name Change My Old Name Is Hanifa Jamadar Sayyad Is On My School Living Certificate And My New Name Is Hanifabi Ameer Hamja Shah As On My Adhar Card Number Is 7819 5188 5025

**change of name**

Old name: is on my PARVINBANO BALAM SHAIKH IS ON MY SCHOOL LIVING CERTIFICATE. and My New Name is PARVIN YUNIS SAYYAD as on Aadhar Card Number is 8768 9488 2363 (08/03/2026)

## ३ हजार किलो गोमांस पकडले

### ९ लाखाचा ऐवज जप्त

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरातील रामनगर, वार्ड नं.०१ येथील एअरटेल टॉवर पासून कॅनॉलच्या कच्च्या रस्त्याने मिल्लतनगर रोडकडून पांढऱ्या रंगाची महिंद्रा कंपनीची बोलेरो पिकअप व टाटा कंपनीची एस छोटा हत्तीवरील चालक गोवंशीय जनावरांचे कत्तल केलेल्या मांसाची विक्री करण्याच्या उद्देशाने घेऊन जात असताना पोलिसांनी या दोन्ही गाड्या पकडल्या. पोलिसांनी त्यांच्याकडून ५ लाख रुपये किंमतीचा ३००० किलोगोमांससह ९ लाखाचा ऐवज पोलिसांनी जप्त केला. यातील दोन्ही चालक पसार झाले.

पोलीस उपनिरीक्षक रोशन निकम, शासकीय वाहन चालक असई राजेश सुर्यवंशी, होमगार्ड अझर तांबोळी हे शहर परिसरात रात्रगस्त करत असतांना कॅनॉलच्या जवळ जाऊन थांबलो. एक चक-०६-इऋ-३८८३ यामध्ये महिंद्रा बोलेरो पिकअप व क्र.चक-४१-ऋ-४६४० टाटा एस छोटा हत्ती रामनगर, वार्ड नं.०१ येथील एअरटेल टॉवर पासुन कॅनॉलच्या कच्च्या रस्त्याने मिल्लतनगर रोडकडे जातांना दिसले. म्हणुन या पथकाने नमुद संशयीत वाहनांना थांबण्याचा इशारा केला असता आम्हा पोलीस पथक व पोलीस व्हॅनला पाहुन सदर वाहनावरील चालक दोन्ही वाहने तेथेच थांबवुन अंधाराचा फायदा घेऊन पळुन गेले. यानंतर सदर वाहनांची पंचांसमक्ष आम्ही पोलीस पथकाने पाहणी केली असता त्यात ३००० किलो गोवंशीय गोमांस, व चक-०६-इऋ -३८८३ बोलेरो पिकअप, क्र. क्र.चक-४१-ऋ-४६४० टाटा कंपनीचा एस छोटा हत्ती असा एकुण ९ लाख रुपये किंमतीचा ऐवज पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल अजित अशोक पटारे यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी पांढऱ्या रंगाची महिंद्रा कंपनीची बोलेरो पिकअप व टाटा कंपनीची एस छोटा हत्ती या गाड्यांवरील चालकांविरुध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ चे सुधारित कायदा सन २०१५ चे कलम ५, ५(अ), (ब), ९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जलसंधारणचा बडा अधिकारी ७ हजारांसाठी एसीबीच्या ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** दीपक बरकसे

भ्रष्टाचाराच्या विरोधात सातत्याने मोहीम राबवत असलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (अउइ) आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये एक मोठी कारवाई करत प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.

वैजापूर जलसंधारण विभागातील एका वर्ग-१ अधिकाऱ्याला ७,००० रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. विशेष म्हणजे, तंत्रज्ञानाचा वापर करत हा लाचेचा व्यवहार चक्क 'फोन पे' (झहेपशझश) या ऑनलाईन माध्यमाद्वारे करण्याचा प्रयत्न या अधिकाऱ्याच्या अंगाशी आला आहे. निखिल अशोक कवाडे (वय ३३ वर्ष) असे या अटक करण्यात आलेल्या उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्याचे नाव आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, या प्रकरणातील ३५ वर्षीय तक्रारदार यांची 'टूर्स अँड ट्रॅव्हल्स'ची एजन्सी आहे. त्यांनी आपली बोलेरो गाडी जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत येणाऱ्या वैजापूर जलसंधारण विभागाला मासिक भाडेतत्त्वावर दिली होती. या गाडीचे भाड्याचे बिल प्रलंबित होते. हे प्रलंबित बिल तयार करणे, एम.बी. बुक (चशरींअॅशाशपीं इेज्ञ), लॉग बुक आणि काँटीजेन्सी बिल यावर स्वाक्षरी करून ते अंतिम मंजुरीसाठी मुख्य कार्यालयाकडे पाठवणे, हे काम आरोपी निखिल कवाडे यांच्या अखत्यारीत होते. मात्र, हे हक्काचे बिल पुढे पाठवण्यासाठी कवाडे यांनी तक्रारदाराकडे १०,००० रुपयांच्या लाचेची मागणी केली. सरकारी काम करण्यासाठी अशा प्रकारे पैशांची मागणी झाल्याने तक्रारदार संतप्त झाले आणि त्यांनी लाच न देण्याचा निर्णय घेत थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यालय गाठले.



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या तक्रारीची गंभीर दखल घेत ७ मार्च २०२६ रोजी सापळा रचला. विभागाच्या पथकाने आधी लाचेच्या मागणीची पंचांसमक्ष पडताळणी केली. या पडताळणी दरम्यान, आरोपी निखिल कवाडे याने १०,००० रुपयांची मागणी करून तडजोडीनंतर ७,००० रुपये स्वीकारण्याचे मान्य केले. धक्कादायक बाब म्हणजे, रोकड पकडली जाण्याच्या भीतीने कवाडे याने ही रक्कम 'फोन पे' द्वारे ऑनलाईन स्वीकारण्याचे मान्य केले. वैजापूर येथील अयोध्या नगर, शिवूर रोड परिसरात हा सापळा लावण्यात आला होता. तक्रारदाराने जसे ७,००० रुपये ऑनलाईन ट्रान्सफर केले, तसाच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने कवाडे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सॅमसंग कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून, त्यातील डिजिटल व्यवहारांचे विश्लेषण सध्या सुरू आहे.

ही यशस्वी कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक माधुरी केदार कांगणे आणि अपर पोलीस अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सापळा पथकाचे नेतृत्व पोलीस उपअधीक्षक बाळासाहेब सदाशिव शिंदे यांनी केले, तर पोलीस निरीक्षक वाल्मिक कोरे हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. पथकामध्ये अनवेज शेख, प्रकाश डोंगरदिवे आणि चांगदेव बागुल या पोलीस अंमलदारांचा समावेश होता. आरोपी निखिल कवाडे याच्या घरातील झडतीचे कामही रात्री उशिरापर्यंत सुरू होते.

या कारवाईनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना जाहीर आवाहन केल.

### सावित्रीबाई फुले ते कल्पना चावला

## विद्यार्थ्यांनी साकारली कर्तबगार महिलाच्या भूमिका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील नारायणपूर बुद्रुक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, न येथे विविध उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमातून स्त्री सन्मान, स्त्रीशक्ती आणि समाजातील महिलांचे महत्त्व याबाबत प्रभावी संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बिस्मिल्ला बी. नाशेर पटेल होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून मंगल निळ पंचायत समिती सदस्य आणि मंगला काळे सामाजिक कार्यकर्त्या उपस्थित होत्या. तसेच कार्यक्रम मुख्याध्यापिका शकीला नावकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला.यावेळी बोलताना मुख्याध्यापिका शकीला नावकर म्हणाल्या की, आजच्या काळात महिला कुठेच कमी नाहीत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. स्त्रीचा सन्मान म्हणजे आपल्या अस्तित्वाचा सन्मान आहे. त्यांच्या या प्रेरणादायी विचारांना उपस्थितांकडून मोठा प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना वाव देत विविध महान महिलांच्या कार्याचा परिचय करून देणाऱ्या नाटिका आणि



सादरीकरणे केली. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, अंतराळवीर कल्पना चावला तसेच समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या जीवनकार्यावर आधारित सुंदर कलाकृती सादर करून उपस्थितांची मने जिंकली.यासोबतच विद्यार्थिनींनी स्त्रीभ्रूणहत्या थांबली पाहिजे या विषयावर प्रभावी नाटिका सादर करून समाजामध्ये जागरूकतेचा संदेश दिला. या सर्व कार्यक्रमांमधून जागतिक महिला दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांपासून ते ग्रामस्थांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात आले. गावातील सर्व महिलांचा फुल देऊन सन्मान व स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला शाळेच्या दहिवड , काटवे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा नाझेरा पठाण, जैतून शेख, आसमा शेख, सुमय्या पठाण, सविता आदमाने, तसेच गावातील आशा वर्कर, अंगणवाडी सेविका आणि मोठ्या संख्येने महिला वर्ग उपस्थित होता.

## महिला दिनानिमित्त आरोग्य शिबिराचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या नेतृत्वाखाली काल महिला दिनाच्या औचित्य साधून हजारो महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर घेऊन विविध आरोग्याच्या तपासण्या मोफत घेण्यात आल्या. या महिला दिनाचे आयोजन महिला चळवळीच्या नेत्या व माजी सभापती सुनीताताई गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात महिला दिन साजरी करण्यात आला.यावेळी डॉ. पद्मजा गरुड, डॉ. चैताली काशीद,डॉ. कीर्ती आपटकर, डॉ.निखिल बोंबले, डॉ. निविदिता गडाख, उषाताई गडाख यांनी उपस्थिती देऊन महिलांना आरोग्याच्या हितकारक टिप्स दिल्या, दैनिदिन जीवनामध्ये योग्य आहार, उत्तम आरोग्य, आहार हेच आपले औषध असून त्याच्या दिवसातल्या वेळा, अन्न




पदार्थच्या जागरूकता आदी विषयी मान्यवरांनी मनोगत व्येक्त केले.

याप्रसंगी फनी गेम घेण्यात आला त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी शारदाताई फाउंडेशनच्या वतीने ''कृतिशील महिलाचा कर्तृत्व गौरव सोहळा'' महिला यांचा प्रशस्तीपत्रक, फेटा, सन्मानचिन्ह देऊन महिलांना सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी पंचायत समितीच्या माजी सभापती सुनिताताई गडाख म्हणाल्या, माजी मंत्री शंकरावजी गडाख यांच्या नेतृत्वाखाली महिला वर्गांना दरवर्षी हितकारक निर्णय शारदा फाउंडेशनच्या वतीने घेण्यात येतो, त्यास आपला सहभाग मनाला हृदय स्पर्शी असल्याच्या भावना वेक्त केल्या.

महिला नेतृत्ववाण डॉ. नेविदिता गडाख यांनी उपस्थित यांचे आभार मानले. महिला राज मोठ्या संख्येने हजर होत्या.

## उद्योजिका सुवर्णा साबळे शिवदुर्गा पुरस्काराने सन्मानित




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भेंडा :** येथील उद्योजिका सुवर्णा रवींद्र साबळे यांना जागतिक महिला दिनानिमित्त यशस्वी उद्योजका म्हणून उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत हस्ते शिवदुर्गा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.मुंबईत येथे 'शिवसेना महिला सेनेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त दि.८ मार्च रोजी आयोजित 'शिवदुर्गा सन्मान सोहळ्या' मध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विविध क्षेत्रांतील महिलांचा गौरव व उत्कृष्ट उद्योजकांना त्यांच्या कार्यासाठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.सुवर्णा साबळे या मुळच्या नेवासा तालुक्यातील भेंडा बुद्रुक येथील रहिवाशी व ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे सेवानिवृत्त डेप्युटी चिफकेमिस्ट बद्रीनाथ साबळे यांच्या सुनबाई असून सध्या त्या गंगापूर तालुक्यातील गळनिंब या गावी गारमेंट्स निर्मिती व विक्रीचा व्यवसाय करीत आहेत. या व्यवसायाच्या माध्यमातून त्यांनी अनेक महिला व पुरुषांना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. त्यांच्या कामाची दखल घेवून शिवसेना महिला सेनेच्या वतीने उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांचे हस्ते त्यांना शिवदुर्गा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. खा. डॉ. श्रीकांत शिंदे, माजी खासदार गजानन कीर्तिकर, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, खासदार ज्योतीताई वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि . ९ मार्च २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४० १३० ७८० | ५-४ | १४९ १५८ २२० | जोड ५६-९४-७१ ८०-४३ |

### कल्याण

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२६ ४५० ११७ | ९-२ | १५६ १२९ ११० | जोड ९०-४२-५६-४८-२५ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १३० २४८ ६८० | ४-१ | १४९ १२८ १०० | जोड ४७-०१-३२-६५-१८ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# घाटात दबा धरून बसलेले दरोडेखोर पोलिसांच्या जाळ्यात

## शस्त्रांसह चौघे जेरबंद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी** : नगर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून चोरी, घरफोडी आणि लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना स्थानिक गुन्हे शाखेने मोठी धडक कारवाई करत एक भीषण अनर्थ टाळला आहे. मढी ते पाथर्डी मार्गावरील घाटात प्रवाशांना लुटण्याच्या तयारीत दबा धरून बसलेल्या कुख्यात दरोडेखोरांच्या टोळीवर पोलिसांनी मध्यरात्री सापळा रचून झडप घातली. या कारवाईत चार सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून दरोड्यासाठी वापरली जाणारी तीक्ष्ण शस्त्रास्त्रे जप्त करण्यात आली आहेत. पोलिसांच्या या धाडसी आणि वेळीच केलेल्या कारवाईमुळे संभाव्य दरोडा टळल्याने प्रवाशांनीही सुटकेचा निःश्वास सोडला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी अलीकडेच जिल्ह्यात वाढत्या गंभीर गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी विशेष गस्त आणि प्रतिबंधक कारवायांचे आदेश दिले होते.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पथक मढी यात्रेच्या बंदोबस्तासह परिसरात दरोडा प्रतिबंधक गस्त घालत होते. याच दरम्यान पोलिसांना अत्यंत गोपनीय माहिती मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार आकाश मोहन डुकरे आणि विकास उर्फ सुनील दत्तू म्हस्के हे त्यांच्या काही साथीदारांसह मढी घाट परिसरात प्रवाशांना लुटण्यासाठी सशस्त्र दरोडा टाकण्याच्या तयारीत दबा धरून बसले आहेत. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ हालचाल सुरू केली. उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने रात्रीच्या अंधारात मढी घाटाच्या दिशेने कूच करत अत्यंत सावधगिरीने संशयित ठिकाणाला वेढा घातला.

घाटातील रस्त्याच्या कडेला हातात तीक्ष्ण हत्यारे घेऊन काही जण संशयास्पद हालचाली करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. योग्य क्षण साधत पोलिसांनी त्या टोळीवर अचानक धडक कारवाई केली. पोलिसांना पाहताच दरोडेखोरांमध्ये एकच गोंधळ उडाला. काही जण अंधाराचा फायदा घेत जंगलाच्या दिशेने पळून गेले, मात्र पोलिसांनी पाठलाग करून आकाश डुकरे, विकास म्हस्के आणि त्यांच्या आणखी दोन साथीदारांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेले आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर पूर्वीही विविध गुन्हे दाखल असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या ताब्यातून दरोड्यासाठी वापरण्यात येणारी शस्त्रे जप्त करण्यात आली असून पुढील चौकशीत आणखी गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, अंधाराचा फायदा घेऊन पसार झालेल्या उर्वरित साथीदारांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी शोधमोहीम तीव्र केली आहे.

या धडक कारवाईत पोलीस अंमलदार विजय पवार, बाळासाहेब नागरगोजे, सोमनाथ झांबरे, सागर ससाणे, बाळासाहेब गुंजाळ तसेच चालक चंद्रकांत कुसळकर यांनी मोलाची भूमिका बजावली. स्थानिक गुन्हे शाखेच्या या तत्पर कारवाईमुळे पाथर्डी तालुक्यासह परिसरात पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

## द•ख•ल

### कारेगाव ते लोखंडे फॉल रोडवरील कॅनॉल लगतच्या झाडांची कत्तल



**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव लोखंडे फॉल रोड लगत कॅनॉलच्या कडेने असलेली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल झाली असून सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांच्या ही बाब लक्षात आली. सदर झाडे कॅनॉल. झाल्यानंतर सुरती पासून असल्याने मोठी व जुनी झाडे होती. अज्ञात इसमानी ती कोणतीही परवानगी नसताना तोडली असून, पर्यावरण ऱ्हासाचे व नुकसानीचे गलिच्छ काम केले आहे. सदर इसमावर , जलसंपदा विभागाने कार्यवाही करावी व पोलीस यंत्रणेने चौकशी करून गुन्हे दाखल करावेत अशी मागणी येथील सुज्ञ नागरिकांकडून होत आहे.

### अण्णाभाऊ लष्करे प्रतिष्ठानच्या वतीने शिवजयंती निमित्त मिरवणूक

**नेवासा** : शहरामध्ये शिवसेना प्रणित धर्मवीर अण्णाभाऊ लष्करे प्रतिष्ठानच्या वतीने शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली यानिमित्ताने काढण्यात आलेल्या मिरवणूकीत शिव प्रतिमा मिरवणुकीचे चौकाचौकात तोफांच्या सलामीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. जय भवानी जय शिवाजी असा जयघोष करत भगवे ध्वज हातात घेऊन शिव प्रेमींनी जल्लोष केला. छत्रपती शिवरायांच्या नामघोषाने नेवासेनगरी दुमदुमली होती. शिवजयंती निमित्त नेवासा येथील मळगंगा देवी मंदिरापासून शिव प्रतिमा मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. विद्युत रोषणाईने सजविण्यात आलेल्या रथामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ठेवण्यात आला होता. यावेळी शिर्डी लोकसभा मतदार संघाचे शिवसेनेचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, उद्योजक प्रभाकर शिंदे, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, पोलीस निरीक्षक महेश पाटील, नगरपंचायत अधिकारी सागर झावरे, लष्करे प्रतिष्ठानचे प्रमुख बिट्टू लष्करे, शिवसेना शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार, अँड. संजय सुखदान, धनू काळे, शिवसेना शहरप्रमुख नितीन जगताप, उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण, पप्पू परदेशी, कृष्णा परदेशी, सार्थक परदेशी, अंबादास लष्करे, माजी सरपंच सतीश गायके यांच्या हस्ते शिव प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सदरच्या मिरवणुकीत फटाक्यांची आतषबाजी करत तोफांची सलामी देत छत्रपती शिवरायांना मानवंदना देण्यात आली.यावेळी मिरवणूक रथावर विद्युत रोषणाई सर्वांचे आकर्षण ठरली होती. शिवजयंती मिरवणुकीत युवक शिवप्रेमीची संख्या मोठया प्रमाणात होती.यावेळी आठ वर्षीय बालिका कु.संचिता गणेश देवढे हिने छत्रपती शिवाजी महाराजांचा शौर्य पोवाडा व शिवगर्जना सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिवजयंती मिरवणूकीचा समारोप ग्रामदैवत श्री मोहिनीराज मंदिरात करण्यात आला. सदरची मिरवणूक शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

### काष्टीत महाराजस्व समाधान शिबिरातून शेकडो प्रलंबित प्रकरणांचा निपटारा



**लिंपणगाव** : महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियान टप्पा-१ अंतर्गत काष्टी महसूल मंडळाचे शिबिर ७ मार्च २०२६ रोजी राजयोग मंगल कार्यालय येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या शिबिराचे अध्यक्षस्थान स्थानिक आमदार विक्रम पाचपुते यांनी भूषवले. याप्रसंगी तहसीलदार श्रीगोंदा व उपविभागीय अधिकारी यांनी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. शिबिरामध्ये नायब तहसीलदार सचिन डोंगरे, मिलिंद जाधव, बी.डी.ओ. राणी फराटे, पोलीस निरीक्षक किरण शिंदे, आणि मंडळ अधिकारी संदीप तरटे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

शिबिराच्या माध्यमातून 'एक खिडकी' योजनेअंतर्गत महसूल, आरोग्य, वन विभाग, कृषी, महावितरण आणि पुरवठा विभागाशी संबंधित सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या. एकूण २६५ अर्जांपैकी १९१ अर्जांवर तात्काळ कार्यवाही करून लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे व आदेशांचे वाटप करण्यात आले. आरोग्य विभागातर्फे ६८ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली, तर महावितरण आणि वन विभागातर्फे शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.काष्टी मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या शिबिरासाठी विशेष परिश्रम घेतले. शासनाची ही लोकाभिमुख मोहीम ग्रामीण भागातील प्रश्न सोडवण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरत आहे, असे मत आमदार पाचपुते यांनी व्यक्त केले. या शिबिराचा लाभ सुमारे २९७ शेतकरी व ग्रामस्थांनी घेतला.

# पांढऱ्या नंबर प्लेटवर प्रवासी वाहतूक

## आरटीओ कधी येणार ॲक्शन मोडमध्ये?

**प्रतिनिधी / दादा सोनवणे**

**श्रीगोंदा** : तालुक्यात शहर असो की ग्रामीण भाग, पांढऱ्या नंबर प्लेटच्या खासगी वाहनांतून प्रवासी वाहतूक खुलेआम सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. खासगी गाडी, पण धंदा फुल ऑन! अशीच परिस्थिती. असताना अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालय (ठढज) बघ्याची भूमिका घेत असल्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांकडून सरकारची फसवणूक करत असल्याचा आरोप होत आहे. श्रीगोंदा तालुक्यातील शहर असो अथवा ग्रामीण भागात पांढऱ्या नंबर प्लेटच्या खासगी वाहनांतून प्रवासी वाहतूक खुलेआम सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. खासगी गाडी, पण धंदा फुल ऑन! अशीच परिस्थिती.

असताना अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालय (ठढज) बघ्याची भूमिका घेत असल्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांकडून सरकारची फसवणूक होत आहेत याकडे प्रादेशिक परिवहन विभागाने खाजगी वाहतूक आणि प्रवाशी वाहतूक यासाठी वेगवेगळी नियमावली असली तरीही जवळपास सगळीकडेच शहर असो की ग्रामीण भाग, पांढऱ्या नंबर प्लेटच्या खासगी वाहनांतून प्रवासी वाहतूक खुलेआम सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

### अनेक खाजगी गाड्यातून प्रवाशी वाहतूक

श्रीगोंदा तालुक्यात सुरवातीला खाजगी वापरासाठी घेतलेल्या गाड्यावर खुलेआम प्रवाशी वाहतूक सुरु आहे. यासाठी सरकारची खुलेआम फसवणूक केली जात आहे. याकडे पोलीस प्रशासन प्रादेशिक परिवहन विभाग रीतसर डोळेझाक करत असल्यामुळे सगळे काही खुलेआम सुरु आहे.

### गाडीत घरचेच आहेत ही पळवाट ?

प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी एखादे खाजगी वाहन प्रवाशी वाहतूक करत असताना पकडले असता तो वाहन चालक- मालक गाडीतील सर्वांना सांगतात की साहेबांना सांगा की घरातीलच गाडीत आहेत, पण काही वेळा आधार कार्ड तपासले असता अशा अनेक चोऱ्या पकडल्या गेल्याशिवाय राहणार नाहीत. असेही नागरीकातून बोलले जात आहे.

खासगी गाडी, पण धंदा फुल ऑन! अशीच परिस्थिती. पिवळ्या नंबरप्लेट मधून प्रवाशी वाहतूक करायची असल्यास त्यास परमिट घ्यावे लागते मात्र दुसरीकडे खाजगी वाहनाला प्रवाशी वाहतूक करण्यासाठी प्रादेशिक विभागाची परवानगी नसते असे असताना अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालय (ठढज) बघ्याची भूमिका घेत असल्यामुळे काहीतरी चेरी -मेरीची गडबड असल्याचे बोलले जात आहे.हा प्रकार थांबविण्यासाठी यासाठी अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालय यांची अनेक पथके कागदावर तैनात आहेत आणि त्याच्याकडून आजपर्यंत एकही वाहनावर कारवाई झाली नसल्याची माहिती मिळतेय त्यामुळे सगळे काही आलबेल सुरु आहे. त्यामुळे विमा कंपनी यासह राज्य परिवहन विभागाची फसवणूक खुलेआम सुरु आहे पांढऱ्या नंबर प्लेटची गाडी म्हणजे खाजगी वापरासाठी.

प्रवासी वाहतूक करायची असेल तर पिवळी नंबर प्लेट, परवाना, विमा, कर सगळं वैध असणं बंधनकारक अनधिकृत वाहतुकीमुळे प्रवाशांची सुरक्षा धोक्यात,अपघात झाल्यास विमा क्लेम अडकू शकतो. अधिकृत टॅक्सी व्यवसायावर अन्याय होत आहे. त्यासाठी अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन विभाग कधी एक्शन मोडमध्ये येणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# कोकणगाव खून प्रकरणात न्यायासाठी उपोषणाची ठिणगी!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : तालुक्यातील कोकणगाव येथील खून प्रकरणात मुख्य आरोपींना अद्याप अटक न झाल्याने जनमाणसात संतापाची लाट उसळली आहे.न्यायासाठी नातेवाईक यांच्यासह शिव-फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी आता थेट आंदोलनाचा मार्ग स्वीकारला असून १२ मार्च पासून श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. श्रीगोंदा तालुक्यातील कोकणगाव येथील भाऊ रजपूत यांच्या खून होऊन बराच अवधी उलटला तरीही अनेक आरोपी मोकाट फिरत आहेत पोलिसांनी ताब्यात घेतलेले आरोपी लालचेपोटी सोडून देऊन निर्दोष मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे त्यातील खरे आरोपी अजूनही मोकाटच असल्यामुळे मोठ्या प्रमाणात संतापाची लाट उसळली आहे तरीही यंत्रणेकडून अद्यापही न्याय न्याय मिळावा या मागणीसाठी पीडित कुटुंब आणि शिव-फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी आता थेट आंदोलनाचा मार्ग स्वीकारला असून १२ मार्च पासून श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.या आंदोलनाची घोषणा सुरज भाऊसाहेब रजपूत यांनी केली असून आरोपींना अटक होईपर्यंत आणि न्याय मिळेपर्यंत उपोषण मागे घेतले जाणार नाही, असा ठाम इशारा त्यांनी प्रशासनाला दिला आहे. त्यामुळे तालुक्यातील राजकीय व सामाजिक वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.त्यांच्या मुख्य मागण्या मध्ये खून प्रकरणातील मुख्य आरोपींना तात्काळ अटक करावी.पोलिसांनी सोडून दिलेल्या चारही सहआरोपींना पुन्हा अटक करावी.आरोपी महेश चव्हाण याच्यावर 'मोक्का' (चउजउ-) अंतर्गत कारवाई करावी.पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी.पीडित कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे.अश्या मागण्या करण्यात आल्या असून दरम्यान, या आमरण उपोषणामुळे श्रीगोंदा तहसील कार्यालय परिसरात मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता व्यक्त होत असून प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

# संत विश्वेश्वर नाथबाबांच्या त्रिदिनात्मक पुण्यतिथी सोहळ्याची सांगता




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा बुद्रुक येथे विश्वेश्वर संत विश्वेश्वर नाथबाबा यांच्या त्रिदिनात्मक पुण्यतिथी सोहळ्याची काल्याच्या कीर्तनाने व दहीहंडी फोडून उत्साहात सांगता करण्यात आली.

देवगड संस्थानचे प्रमुख भास्करगिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत हा धार्मिक सोहळा पार पडला. युवा प्रबोधनकार व सद्गुरू किसनगिरी बाबा जीवनचरित्र कथाकार हभप लक्ष्मणजी महाराज नांगरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने वातावरण भक्तिमय झाले. कीर्तनानंतर पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी विश्वेश्वर नाथबाबा पब्लिक ट्रस्टच्या वतीने भास्करगिरीया महाराज यांचे संतपूजन करण्यात आले.

तसेच त्रिदिनात्मक सोहळ्यात अन्नदानासह विविध प्रकारे सहकार्य करणाऱ्या दात्यांचाही गौरव देवस्थान विश्वस्त मंडळाने केला. या प्रसंगी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, रामनाथ महाराज पवार, कोंडीराम महाराज पेचे, नारायण महाराज ससे, सचिन महाराज पवार, बाळू महाराज कानडे, गणेश महाराज तनपूरे, सागर महाराज टेमक, रोहित महाराज पटारे, सोमनाथ महाराज पानकडे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज व वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या कीर्तनांचेही आयोजन करण्यात आले.

या सोहळ्यास माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, उपनगराध्यक्ष संजय सुखदान, तसेच विविध मान्यवरांनी भेट देऊन संत विश्वेश्वर नाथबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.

# हॉटेल गोळीबार प्रकरणातील मुख्य आरोपी जेरबंद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : शहरातील बहुचर्चित न्यु कावेरी हॉटेलवरील गोळीबार प्रकरणातील फरार मुख्य आरोपी अक्षय उर्फ चिंग्या विश्वनाथ मोरे (वय २४, रा. पाटोदा गरड, ता. जामखेड) याला स्थानिक गुन्हे शाखा व जामखेड पोलिसांच्या संयुक्त पथकाने अटक केली. तो खर्डा परिसरात आल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. ६ मार्च रोजी स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर व जामखेड पोलीस ठाण्याच्या पथकाने खर्डा परिसरात कारवाई करत आरोपीला मोठ्या शिताफीने पकडले.

या कारवाईत सपोनि हरिष भोये, पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, समीर अभंग यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी तसेच जामखेड पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होते. या प्रकरणातील फिर्यादी रोहित अनिल पवार (वय २९, रा. कान्होपात्रा नगर, जामखेड) हे न्यु कावेरी हॉटेलमध्ये असताना अक्षय उर्फ चिंग्या मोरे, अर्शद अमीन सय्यद व इतर ७ ते ९ साथीदारांनी गैरकायदेशीर जमाव करून पिस्तुलातून गोळीबार करत त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाले होते. तसेच हॉटेलमधील साहित्याची तोडफोड करून फॉर्च्युनर गाडीवर सत्तूर व लाकडी दांड्याने हल्ला करण्यात आला होता.

या घटनेप्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६६९/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमांसह आर्म्स ॲक्ट ३/२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा घडल्यानंतर मुख्य आरोपी अक्षय मोरे फरार होता. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे यांना आरोपी खर्डा परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना कळविले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने न्यु कावेरी हॉटेलवरील गोळीबार, फिर्यादीवरील हल्ला व तोडफोड केल्याची कबुली दिली आहे.

अक्षय उर्फ चिंग्या मोरे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी खून, खुनाचा प्रयत्न, मारहाण, दंगल, दरोडा, खंडणी तसेच आर्म्स ॲक्टअंतर्गत दहापेक्षा अधिक गंभीर गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड पोलीस करत आहेत.

## निमगाव वाघात लाल मातीच्या आखाड्यात

# महाराष्ट्र केसरीसाठी रंगला कुस्त्यांचा थरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर** : महाराष्ट्र राज्य भारतीय शैली कुस्ती संघाच्या मान्यतेने निमगाव वाघा (ता. नगर) येथे वरिष्ठ राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा 'महाराष्ट्र केसरी किताबाची लढत २०२५-२६'साठी अहिल्यानगर जिल्हा संघाची निवड चाचणी मोठ्या उत्साहात पार पडली. बिरोबा मंदिरासमोरील पारंपरिक लाल मातीच्या आखाड्यात झालेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील मल्लांनी दमदार डावपेच सादर करत कुस्त्यांचा थरार रंगविला. स्पर्धेच्या प्रारंभी आखाड्याचे पूजन करून निवड चाचणीचे उद्घाटन वस्ताद भानुदास ठोकळ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आयोजक ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे, बाळू भापकर, संदिप डोंगरे, पोपट शिंदे, विकास निकम, नामदेव भुसारे, संदेश जाधव तसेच क्रीडाप्रेमी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नाना डोंगरे म्हणाले की, नगर जिल्ह्याला कुस्ती क्षेत्रातील दिग्गज मल्लांचा समृद्ध वारसा लाभला आहे. ग्रामीण भागातील अनेक तरुण मल्ल आजही लाल मातीच्या आखाड्यात कठोर सराव करून उत्कृष्ट कामगिरी करत आहेत.

मात्र यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण सराव आणि शिस्त आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कुस्ती या खेळात राजकारण करण्यापेक्षा खेळाडूंना प्रोत्साहन व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे अधिक महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. दि. १२ ते १५ मार्चदरम्यान सासवड (ता. पुरंदर, जि. पुणे) येथे पै. प्रकाश बापू जगताप प्रतिष्ठानच्या वतीने मातीवरील वरिष्ठ राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा 'महाराष्ट्र केसरी'चे आयोजन करण्यात आले आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी जिल्हा संघाची निवड करण्यासाठी निमगाव वाघा येथे ही निवड चाचणी घेण्यात आली. या निवड चाचणीत ५५, ६०, ६५, ७०, ७५, ८०, ८५, ९० किलो तसेच ८५ ते १४० किलो महाराष्ट्र केसरी गटांमध्ये सामने झाले. जिल्ह्यातील सुमारे १७० मल्लांनी सहभाग नोंदवत दमदार खेळ सादर केला. अखेरीस विविध वजन गटांतून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १० कुस्तीपटूंची जिल्हा संघासाठी निवड करण्यात आली असून ते सासवड येथे होणाऱ्या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

ही स्पर्धा संघटनेचे राज्य सचिव मोहन खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पंच म्हणून संदिप डोंगरे व पोपट शिंदे यांनी काम पाहिले. आयोजकांच्या उत्तम नियोजनामुळे निवड चाचणी यशस्वीरीत्या पार पडली.

# बारामतीतल्या रेकॉर्डवरील गुन्हेगाराची थेट नागपूर कारागृहात रवानगी

## एमपीडीए कायद्यांतर्गत १ वर्षासाठी जेल; बारामती तालुका पोलिसांचा गुन्हेगारांना इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती:** बारामती तालुका पोलीस ठाण्याने रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारावर कठोर पाऊल उचलत त्याच्यावर एमपीडीए कायदा १९८१ अंतर्गत कारवाई केली आहे. गंभीर स्वरूपाचे गुन्हे करूनही सुधारणा न दाखवणाऱ्या आरोपीला थेट नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे.पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तांदुळवाडी (ता. बारामती) येथील सुरेंद्र रवींद्र काजळे याच्याविरुद्ध पुणे ग्रामीण तसेच बारामती परिसरातील विविध पोलीस ठाण्यांत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. दरोडा, दुखापत, गंभीर दुखापत, विनयभंग व फसवणूक अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये त्याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती कायम ठेवत पुन्हा नव्याने गुन्हे करण्याचा क्रम सुरूच असल्याने त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, हातभट्टीवाले, धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यास आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ (चझ्ूअ) अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आला. हा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला. सर्व कागदपत्रांची छाननी करून जिल्हाधिकाऱ्यांनी आरोपीस एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ अंमलबजावणी करत आरोपीला नागपूर मध्यवर्ती कारागृहात हलविले. बारामती तालुका पोलिसांच्या या निर्णायक कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून गुन्हेगारी प्रवृत्तींवर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.बारामती पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम पवार पोलीस अंमलदार महेश बनकर स्थानिक गुन्हे शाखा आणि सागर देशमाने विकास खाडे बारामती तालुका पोलीस ठाणे यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

'बारामती विभागात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांची भूमिका ठाम आणि कठोर आहे. रेकॉर्डवरील तसेच सराईत गुन्हेगारांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून, समाजात दहशत निर्माण करणाऱ्यांना कुठलीही सूट दिली जाणार नाही. वारंवार गुन्हे करणाऱ्यांवर एमपीडीएसारख्या कठोर कायद्यांखाली थेट कारवाई होईल'.

**गणेश बिरादार (अप्पर पोलीस अधीक्षक )**

---------------------------

'बारामती उपविभागात शांतता आणि सुरक्षितता टिकवण्यासाठी पोलिस प्रशासन कटिबद्ध आहे. वारंवार गुन्हे करणाऱ्या व्यक्तींवर विशेष नजर ठेवून कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाईल.सामान्य नागरिकांच्या सुरक्षेशी तडजोड होणार नाही..'

**सुदर्शन राठोड (उपविभागीय पोलीस अधिकारी )**

---------------------------

'जिल्ह्यात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाईवर विशेष भर देण्यात येत आहे. २०२५ आणि २०२६ या कालावधीत आतापर्यंत १६ गुंडांना एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध करण्यात आले असून ही कारवाई पुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. कायद्याचा धाक निर्माण करणे आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना बळकट करणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. गुन्हेगारीकडे वळणाऱ्यांना वेळीच इशारा देणे आणि आवश्यकतेनुसार कठोर पावले उचलणे याबाबत पोलिस प्रशासन कटिबद्ध आहे.'

**संदिपसिंह गिल (पोलीस अधीक्षक)**

## द•ख•ल

### शिरदाळे येथे शंभू महाससभा उत्साहात

**लोणी धामणी :** आंबेगाव येथील शिरदाळे येथे शंभू महादेव मंदिराची प्राणप्रतिष्ठा गुरुवार (दि. ५ मार्च) रोजी भक्तिमय वातावरणात व मोठ्या उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमासाठी गावातील ग्रामस्थांनी सक्रिय सहकार्य केले.या निमित्ताने सायंकाळी ४ ते ५ या वेळेत भास्कर महाराज पवार (आळंदी) यांची प्रवचन सेवा व हरिपाठ झाला. त्यानंतर सायंकाळी ६ ते ८ या वेळेत आदिनाथ महाराज जुन्नरकर यांची कीर्तनसेवा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमास भाविकांची उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तान्हाजी महाराज तांबे, शंकर द. तांबे, बाळासाहेब तांबे, वसंत तांबे, हनुमंत तांबे आणि संतोष तांबे यांनी विशेष प्रयत्न केले.

### एकमेकांना मनसोक्त रंग लावत रंगपंचमी साजरी



**सोमेश्वरनगर -** होळी झाली की सर्वांना वेध लागतात ते रंगपंचमी सणाचे रंगपंचमी म्हणजे रंगांचा सण होळीनंतर पाच दिवसांनी साजरा करण्यात येतो तो रंगपंचमीचा सण लहान थोर एकत्ररंगाचा हा सण विवार ८ मार्च रोजी साजरा करण्यात आला.रविवार सुट्टी अन् रंगपंचमी असल्याने बारामतीच्या पश्चिम भागात मुला मुलांनी सकाळ पासूनच रंगपंचमीला सुरुवात केली होती दुपारच्या वेळेस उन्हाची तीव्रता वाढली असल्याने थंडगार पाणी एकमेकाच्या अंगावर फेकत रंगपंचमीचा आनंद द्विगुणित केल्याचे चित्र पाहायला मिळाले.लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना हा सण आवडतो. देशभरात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. एकमेकांना शुभेच्छा देत आनंद साजरा करण्याचा हा सण आहे. मनातील हेवे-दावे बाजूला ठेवून मन मोकळेपणाने रंगपंचमी साजरी केली जाते.

### नागापूर येथे सांस्कृतिक कला महोत्सव उत्साहात

**वळती :** नागापूर (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर व अंगणवाडी नागापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक कला महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. नृत्य, गीत, नाटिका, देशभक्तीपर




सादरीकरण तसेच पारंपरिक कला प्रकारांमधून विद्यार्थ्यांनी आपली कला आणि कौशल्य प्रभावीपणे सादर केले. विद्यार्थ्यांच्या आकर्षक सादरीकरणामुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष रंगत आली.या कार्यक्रमाला पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष देवदत्त निकम, जिल्हा परिषद सदस्य प्रीती थोरात, पंचायत समिती सदस्य प्रियांका वाघ, माजी सरपंच गणेश यादव, केतन वाघ, सरपंच सुनिल शिंदे, गणेश मस्के, शालेय समितीचे उपाध्यक्ष नंदू पोहकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास पालक, ग्रामस्थ व शिक्षकवर्ग यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे मान्यवरांनी विशेष कौतुक केले व त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक उदयकुमार लोढे, कर्मचारी तसेच पालकांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गीताली लोढे यांनी केले.

### राज्य सेवा मुख्य परीक्षा ५ एप्रिलपासून एमपीएससी उमेदवारांच्या मागणीला यश

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेतल्या जाणाऱ्या राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०२५ च्या वेळापत्रकात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. २७ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध केलेल्या मूळ अधिसूचनेनुसार ही परीक्षा २९ मार्चपासून सुरू होणार होती. मात्र, आता ती ५ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार आहे. परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी वेळ वाढवून मिळावा, या उमेदवारांच्या मागणीची दखल घेत आयोगाने हे सुधारित वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. आयोगाने गुरुवारी प्रसिद्ध केलेल्या शुद्धिपत्रकानुसार, राज्य सेवा मुख्य परीक्षेचे आयोजन आता एप्रिल आणि मे महिन्यातील विविध सत्रांमध्ये केले जाईल. परीक्षेची सुरुवात रविवारी, ५ एप्रिल रोजी भाषा पेपर क्रमांक १ आणि २ ने होईल. त्यानंतर १८ एप्रिल रोजी निबंधाचा पेपर, तर १९ एप्रिल रोजी सामान्य अध्ययन १ आणि २ चे पेपर होतील. २६ एप्रिल रोजी सामान्य अध्ययन ३ आणि ४ चे पेपर घेतले जातील. परीक्षेचा शेवटचा टप्पा मे महिन्यात असून, २ मे रोजी वैकल्पिक विषय पेपर क्रमांक ८ आणि १० मे रोजी वैकल्पिक विषय पेपर क्रमांक ९ ची परीक्षा पार पडेल. दरम्यान, केवळ परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करण्यात आल्यामुळे आता उमेदवारांना सरावासाठी अतिरिक्त वेळ मिळाला आहे. नवीन अभ्यासक्रम आणि विषयांची व्याप्ती पाहता जुन्या वेळापत्रकानुसार उजळणीसाठी पुरेसा वेळ मिळत नव्हता. आता परीक्षेच्या तारखा थोड्या पुढे गेल्यामुळे आम्हाला शेवटच्या टप्प्यातील सराव आणि मॉक टेस्ट सोडविण्यासाठी अतिरिक्त १०-१५ दिवस मिळाले आहेत. यामुळे नक्कीच आमचा आत्मविश्वास वाढेल आणि परीक्षेला सामोरे जाणे सोपे होईल, अशी प्रतिक्रिया रोहित काकडे यांनी दिली.

## हेवेदावे विसरून नेवासा शहरात रंगपंचमी साजरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** शहरामध्ये रंगपंचमी उत्सव आनंदात साजरा करण्यात आला. रंगपंचमीच्या निमित्ताने विविध पक्षातील युवक पदाधिकारी एकत्रित आले.हेवेदावे विसरून एकमेकांना रंग लावून नेवासा शहरात रंगपंचमी साजरी करण्यात आली.यावेळी नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांना चौकात घेरून विविध पक्षाच्या मित्रांकडून व सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांना रंगवले.

रविवारी आलेल्या रंगपंचमी उत्सवाच्या निमित्ताने विविध संघटनेच्या तरुणांनी चौकाचौकात फिरून आपल्या ओळखीच्या मित्राला घेरून त्यास रंगवले.नेवासा शहरातील प्रत्येक चौकाचौकात युवकांकडून रंगपंचमीचा जल्लोष करण्यात आला. एकमेकांना रंगविलेले युवकांचे चेहरे पहाण्यासारखे होते.कुणीच कोणाला ओळखू देखील येत नव्हते असे चित्र पहावयास मिळाले.होली के दिन,दिन खिल जाते है,रंगोमे रंग मिल जाते है,गिले शिकवे भूलकर कर दोस्तो, दुष्मन भी गले मिल जाते है...या शोले चित्रपटातील गाण्याची आठवण यावेळी झाली कारण सर्व मतभेद हेवेदावे विसरून रंगपंचमी सण साजरा करण्यात आला. निवडणूकीत आमने सामने असलेले युवा कार्यकर्ते सर्व मतभेद विसरून एकमेकांना रंग लावून आनंदोत्सव साजरा करतांना दिसत होते राष्ट्रीय ऐक्य निर्माण करणारे अनेक सण आपल्या देशात साजरे होतात इतरांना आपल्या संस्कृतीचा हेवा वाटतो त्याच पैकी राष्ट्रीय ऐक्य निर्माण



करणारा रंगपंचमी सण नेवासा शहरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होत असल्याबद्दल नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांनी समाधान व्यक्त केले यावेळी झालेल्या रंगपंचमी उत्सवात नगरसेवक राजू काळे,जालिंदर गवळी, कृष्णा परदेशी,धनूभाऊ काळे, भाजपचे शहराध्यक्ष मनोज पारखे,धनूभाऊ काशीद, सतीश चक्रनारायण ,अजित नरुला,महेश पडूरे,गणेश गाडवे,अमोल पिटेकर,प्रेस क्लबचे मोहन गायकवाड, शंकर नाबदे,आकाश कडु यांच्यासह विविध संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

## युपीएससी परीक्षेत शंकरपुर येथील प्रज्वल पोळचे घवघवीत यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** कोणतीही महागडी शिकवणी न लावता आपल्या अफाट जिद्दीला सलाम करायला लावत गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन जवळील शंकरपुर या गावातील प्रज्वल पोळ या तरुणाने यूपीएससीमध्ये खऱ्या अर्थाने गगनभरारी घेतली आहे. अवघ्या २५ व्या वर्षी त्याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या युपीएससी नागरी सेवा परीक्षा २०२५ मध्ये ४३४ वी रँक मिळवत सलग दोन अपयशानंतर तिसऱ्या प्रयत्नात मारलेली ही दमदार बाजी संपूर्ण तरुणाईसाठी प्रेरणादायी ठरत आहे.प्रज्वल पोळ याच्या या घवघवीत यशामुळे लासूर स्टेशनसह संपूर्ण गंगापूर तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.प्रज्वल याचे मूळ गाव तालुक्यातील शंकरपूर असून, सध्या त्याचे कुटुंबीय लासूर येथे वास्तव्यास आहेत. त्याच्या या उत्तुंग यशाबद्दल पंचक्रोशीतील मित्रमंडळी, व्यापारीवर्ग, सामाजिक संस्था तसेच नागरिकांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळाप्रमुखपदी ॲड.राजेंद्र उमाप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी वारी पायी पालखी सोहळ्यासाठी यंदा सोहळाप्रमुखपदी पुण्यातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. राजेंद्र बाबूराव उमाप यांची निवड करण्यात आली आहे. माऊली देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी ही माहिती दिली. यावेळी विश्वस्त चैतन्य महाराज कबीर, हभप पुरुषोत्तम महाराज पाटील, ॲड.रोहिणी पवार आणि व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर उपस्थित होते. आषाढी वारीसाठी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान ८ जुलै रोजी आळंदी येथून होणार असून २५ जुलै रोजी पंढरपूर येथे आषाढी एकादशीचा मुख्य सोहळाम पार पडणार आहे.

आळंदीत संस्थान कमिटीच्या बैठकीत सोहळ्याच्या नियोजनाबाबत चर्चा करताना उमाप यांची सोहळाप्रमुख म्हणून निवड करण्यात आल्याचे देखणे



यांनी सांगितले. ॲड.उमाप हे पुण्यातील ज्येष्ठ वकील असून त्यांनी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा या संस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष अशी महत्त्वाची पदे भूषवली आहेत. यापूर्वी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त म्हणूनही जबाबदारी पार पाडली आहे. त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा लाभ पालखी सोहळ्याच्या व्यवस्थापनात होईल, असा विश्वास संस्थानकडून व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, सोहळाप्रमुखपदी निवड झाल्यानंतर उमाप यांनी वारकरी भाविकांच्या सोयी-सुविधांना प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. पालखी प्रस्थानापासून सोहळा पंढरपूरात दाखल होईपर्यंत तसेच पंढरपूरहून परतीच्या प्रवासातही लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची विशेष काळजी घेतली जाईल. प्रशासनाशी समन्वय ठेवून सोहळा वैभवात, आनंदात, शिस्तीत आणि जल्लोषात पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील, असे त्यांनी सांगितले.

## मिनी सरस – सावित्री जत्रा २०२६ ग्रामीण महिलांच्या उद्योगांना नवी संधी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जिल्हा परिषद पुणे आयोजित मिनी सरस – सावित्री जत्रा २०२६ विक्री व प्रदर्शनाचा शुभारंभ सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात झाला. ग्रामीण महिलांच्या उद्योगांना बाजारपेठ उपलब्ध करून देत महिला सक्षमीकरणाला चालना देणारा हा उपक्रम ठरला.

या वेळी स्वयंसहाय्यता समूहांच्या आर्थिक बळकटीसाठी विविध बँकांच्या माध्यमातून सुमारे ४० कोटी रुपयांच्या कर्ज धनादेशांचे वितरण करण्यात आले. तसेच विभागीय यशवंतराव चव्हाण पंचायत राज पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. पंतप्रधान आवास योजना-ग्रामीण व महाआवास योजनेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती व संस्थांचाही गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास मेधा कुलकर्णी, शंकर मांडेकर, बापूसाहेब पठारे, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शालिनी कडू, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, अधिकारी-कर्मचारी आणि महिला स्वयंसहाय्यता समूह मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मिनी सरस :-** सावित्री जत्रा २०२६ प्रदर्शनाला भेट देत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी महिला स्वयंसहाय्यता समूहांनी तयार केलेल्या उत्पादनांची पाहणी करून खरेदी केली. यावेळी मान्यवर व महिला उद्योजिका उपस्थित होत्या.

या प्रसंगी प्रभाग संघांमार्फत कृषी ट्रॅक्टर खरेदी उपक्रमाला चालना देण्यात आली. तसेच जिल्हा परिषदेकडून सुरू करण्यात आलेल्या ई-मोबाईल व्हॅन उपक्रमाच्या प्रतीकात्मक चाव्यांचे वितरण करण्यात आले. या माध्यमातून ग्रामीण महिलांची उत्पादने थेट शहरातील बाजारपेठेत पोहोचवण्यास मदत होणार आहे.

मिनी सरस – सावित्री जत्रा २०२६ अंतर्गत विक्री व प्रदर्शन सिंचन नगर, एग्रीकल्चर कॉलेज परिसर, शिवाजीनगर येथे ७ ते ११ मार्चदरम्यान पुणेकरांसाठी खुले ठेवण्यात आले आहे. ग्रामीण महिलांनी तयार केलेली हस्तकला, घरगुती उद्योग उत्पादने आणि पारंपरिक खाद्यपदार्थ येथे उपलब्ध आहेत.

## कंत्राटी कामगारांचे साखळी उपोषण स्थगित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**बारामती :** बारामती नगरपरिषद कार्यक्षेत्रातील कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्यांसाठी जनशक्ती कंत्राटी कामगार संघाच्या वतीने सुरू करण्यात आलेले साखळी उपोषण प्रशासनाच्या आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले आहे.

जनशक्ती कंत्राटी कामगार संघाचे संस्थापक अध्यक्ष गौरव रणधीर अहिवळे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेसमोर साखळी उपोषण सुरू करण्यात आले होते. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष सचिन सातव, आरोग्य सभापती नवनाथ बल्लाळ, नगरसेवक तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाली.

कामगारांच्या मागण्यांची दखल घेत नगराध्यक्ष सचिन सातव यांनी लेखी पत्र देत ठेकेदारांना कामगारांच्या मागण्यांवर योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. काही विभागातील ठेकेदारांनी तत्काळ मागण्या मान्य करण्यास सुरुवात केली असल्याची माहिती देण्यात आली.

कामगारांच्या मागण्यांबाबत प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका घेतली जात असल्याने सध्या सुरू असलेले साखळी उपोषण तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष गौरव अहिवळे यांनी दिली. आरोग्य सभापती नवनाथ बल्लाळ यांनी आरोग्य विभागातील कंत्राटी कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

कामगारांच्या मागण्यांबाबत प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने पुढील निर्णय परिस्थितीनुसार घेण्यात येईल, असेही संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

यावेळी उपनगराध्यक्ष श्वेता नाळे, गटनेते संजय संघवी, विरोधी पक्ष नेत्या आरतीताई शेंडगे (गव्हाळे), नगरसेवक राजेंद्र सोनवणे, अमर धुमाळ, अमोल कावळे, सोमनाथ गजाकस, विशाल हिंगणे उपस्थित होते.

तसेच जनशक्ती कंत्राटी कामगार संघाचे शहराध्यक्ष आकाश शिंदे, उपाध्यक्ष विजय मस्के, कार्याध्यक्ष निखिल सरोदे, सहकार्याध्यक्ष अनिकेत धालपे, सहसंघटक ओम शिंदे, महिला शहराध्यक्ष संगीता खरात, महिला उपाध्यक्ष प्रतिभा वाघमारे, महिला कार्याध्यक्ष रुपाली वाडेकर, महिला संघटक अलका बगाडे, महिला सरचिटणीस अनिता पवार, महिला सहकार्याध्यक्ष सुजाता साबळे, महिला सहसंघटक सुमन अहिवळे यांसह पदाधिकारी, सदस्य संतोष भट, स्वप्निल लोंढे, राहुल सोनवणे आणि इतर कंत्राटी कामगार उपस्थित होते.कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी जनशक्ती कंत्राटी कामगार संघ सातत्याने लढा देत राहील, असा निर्धार संस्थापक अध्यक्ष गौरव अहिवळे यांनी व्यक्त केला.

## वाघापूरात महसूल अभियानातून ५८१ प्रकरणांचा निपटारा

महसूल प्रशासन नागरिकांच्या दारी पोहोचवण्याच्या उद्देशाने हे अभियान राबवले जात आहे. वाघापूर येथे मोठ्या प्रमाणावर प्रकरणे निकाली काढून नागरिकांना त्वरित सेवा देण्यात आली, असे महसूल प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

============== ==============

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** पुरंदर तालुक्यातील वाघापूर येथे तहसीलदार कार्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान २०२६ अंतर्गत महसूल शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात कुंभारवळण व राजेवाडी मंडळातील विविध महसुली तसेच शासकीय योजनांशी संबंधित एकूण ५८१ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. या अभियानात फेरफार, ७/१२ दुरुस्ती, डिजिटल ७/१२, ८-अ उतारे वाटप, तुकडेबंदी निर्णय, वर्ग-२ जमिनीची प्रकरणे, भूमापन कागदपत्रे तसेच लोकसेवा हक्क कायद्यानुसार जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखले, रहिवास प्रमाणपत्र अशा विविध सेवा नागरिकांना देण्यात आल्या. याशिवाय संजय गांधी व इंदिरा गांधी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची नोंदणी, पीएम किसान, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक,तक्रार निवारण तसेच शिधापत्रिका संबंधित ७० प्रकरणे निकाली काढण्यात आली. हस्तलिखित नोंदीनुसार ई-सेवा केंद्रातून उत्पन्न, रहिवासी व डोमिसाइल मिळून २२ प्रमाणपत्रे देण्यात आली. आधार कार्डची १६ ते १८ नोंदणी करण्यात आली. तसेच पर्यावरण व कृषी विभागाशी संबंधित उपक्रम, पिक विमा, पीएमएफएमई योजनेची माहिती देण्यात आली.




## जागतिक महिला दिनानिमित्त मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू निदान शिबिर

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** जागतिक महिला दिनानिमित्त बारामती जेष्ठ नागरिक निवास येथे महिलांसाठी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू निदान शिबिराच आणि मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. बारामती शहर व आसपासच्या ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बारामती जेष्ठ नागरिक निवास तांदुळवाडी या ठिकाणी ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .या शिबिरात पुण्यातील नामांकित नेत्ररोग तज्ञ डॉ. परीक्षित गोगटे सर यांच्या टीमने रुग्णांची तपासणी करून सर्व महिला रुग्णांना डोळ्यांची काळजी कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच नंबरचे मोफत चष्मे वाटप करण्यात आले. या शिबिरात एकूण ७० महिलांनी सहभाग नोंदवला. बारामती ज्येष्ठ नागरिक निवासी या ठिकाणी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी नेत्र तपासणी




केली जाते. प्रत्येक महिन्याच्या चौथ्या बुधवारी नेत्र शस्त्रक्रिया शिबिर माफक दरात आयोजित केले जाते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष किशोर मेहता , उपाध्यक्ष राजेंद्र बोरावके, खजिनदार डॉ. सौ. सुहासिनी सातव, उपखजिनदार. डॉ. अजिंक्य राजेनिंबाळकर, विश्वस्त अमित बोरावके, विश्वस्त डॉ अजित अंबर्डेकर इ. उपस्थित होते.

## रांगोळीच्या माध्यमातून 'स्वच्छतेचा संदेश' आळंदीत नगरपरिषदेचा अभिनव उपक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** शहरातील काही ठिकाणी नागरिकांकडून वारंवार उघड्यावर कचरा टाकला जात असल्याने स्वच्छतेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर आळंदी नगरपरिषदेने अशा ठिकाणी रांगोळी काढून स्वच्छतेचा संदेश देत त्या जागांचे सुशोभीकरण करण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे आणि शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी त्यांचा सहभाग वाढविणे हा उद्देश असल्याचे नगरपरिषदेने स्पष्ट केले आहे.आळंदी नगरपरिषदेमार्फत शहरात दैनंदिन घंटागाडीच्या माध्यमातून घरगुती कचरा संकलनाची नियमित व्यवस्था करण्यात आली आहे. तरीदेखील काही नागरिकांकडून आपल्या सोयीनुसार सार्वजनिक ठिकाणी तसेच उघड्यावर कचरा टाकला जात असल्याचे वारंवार निदर्शनास येत आहे. यापूर्वी अशा प्रकारे कचरा टाकणाऱ्यांवर नगरपरिषदेच्या पथकांमार्फत दंडात्मक कारवाईही करण्यातप्रमाणित आली होती. मात्र अपेक्षित प्रमाणात सुधारणा दिसून न आल्याने जनजागृतीसाठी हा वेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे. मरकळ रस्ता डीपी, जनाबाई धर्मशाळा परिसर, मरकळ चौक, चावडी चौक, प्रदक्षिणा रस्ता, प्रदक्षिणा रस्त्यावरील चायनीज सेंटरजवळ, घुंडरे अळी चौक, वडगाव रस्ता सुलभ शौचालय शेजारी, चाकण चौक, वाय जंक्शन, केळगाव रस्ता, सुलभ शौचालयाजवळील फूटपाथ, केळगाव बायपास, सिद्धबेट रस्ता तसेच पुलावरील परिसर अशा विविध ठिकाणी रांगोळी काढून परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे.दरम्यान, ज्या ठिकाणी वारंवार कचरा टाकला जातो त्या ठिकाणी रांगोळीच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देण्याचा हा प्रयत्न असल्याचे नगरपरिषदेने सांगितले.

## द•ख•ल

### महासंग्राम युवा मंचच्या वतीने कर्तबगार महिलांचा सन्मान सोहळा

**कर्जत** : जागतिक महिला दिनानिमित्त कर्जत शहरातील जवळपास पाचशे छोट्या-मोठ्या व्यवसायातून आपली ओळख निर्माण करणाऱ्या नारीशक्तीचा सन्मान सोहळा मंगळवार, दि १० रोजी कर्जत बाजारतळावर होणार असून या कार्यक्रम ाचा लाभ महिलांनी घ्यावा असे आवाहन माजी नगराध्यक्षा उषा राऊत यांनी पत्रकार परिषदेत केले. महासंग्राम युवा मंच यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी स्टारप्रवाहाची स्वर-रागिणी वर्षा एखंडे प्रमुख आकर्षण असणार असून खासदार सुप्रिया सुळे आणि बारामती ॲग्रोच्या विश्वस्त सुनंदा पवार यांच्या उपस्थितीमध्ये नारी सन्मान सोहळा पार पडणार आहे. कर्जत महासंग्राम युवा मंचच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत कर्जत शहरातील स्वताच्या हिमतीवर छोट्या-मोठ्या व्यवसायात आपले नाव उज्वल केलेल्या कर्तबगार महिलांचा सन्मान सोहळा मंगळवारी संध्याकाळी पार पडणार असल्याची माहिती माजी नगराध्यक्षा उषा राऊत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### संत तेरेजा चर्चमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात

**शिरसगाव** : हरेगाव येथील संत तेरेजा चर्चमध्ये ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास नाशिक धर्मप्रांताचे महागुरुस्वामी बिशप बार्थोल बरेटो प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात बिशप बार्थोल बरेटो, प्रमुख धर्मगुरू फा. डॉमिनिक, सहाय्यक धर्मगुरू फा. संतान तसेच सिस्टर प्रिस्का यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी महिलांचे औक्षण करून गुलाबपुष्प देत त्यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मिनल फ ुलवर (अध्यक्षा, लीनेस क्लब श्रीरामपूर), विधी अधिकारी पल्हारे, पायल कसलीवाल व माधुरी सोनावणे उपस्थित होत्या. यावेळी बिशप बरेटो यांनी महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेश दिला. डॉ. मिनल फुलवर यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले, तर वकील पल्हारे यांनी स्त्री संरक्षण कायद्याविषयी माहिती दिली. पायल कसलीवाल यांनी आर्थिक गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात महिलांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. सिस्टर ज्योती गजभिव व सिस्टर प्रिस्का यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिस्टर अनिता, सिस्टर अलबिना, सिस्टर आग्नेस व इतरांनी सहकार्य केले.

### जिल्ह्यातील इपीएस ९५ पेन्शनधारक दिल्ली आंदोलनासाठी शिर्डी येथून रवाना

**शिरसगाव** : राष्ट्रीय संघर्ष समिती अहिल्यानगर*या संघटनेचे पेन्शनधारक आज दि. ७ मार्च २०२६ रोजी सकाळी ९:३० वाजता साईनगर शिर्डीहून कालका एक्सप्रेस ने अहिल्यानगर दोन टीम पेन्शनवाढ निर्णय न झाल्याने जंतर मंतर दिल्ली आंदोलनासाठी रवाना झाले. हे आंदोलन ९/ १०/ ११ असे ३ दिवस होणार आहे.

या आंदोलनात पश्चिम भारत संघटक सुभाष पोखरकर, सुरेश कटारिया, अशोक देशमुख, अर्जुन जाधव, अशोक जोंधळे, सुरेश राठोड, दगडू बडाख बी आर चेडे गागरे आदींसह धुळे, अहिल्यानगर जिल्ह्यातील पेन्शनधारक सहभागी झाले.

## बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ देण्यासाठी

# ‘उमेद मॉल’ लवकरच : आ. राजळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**पाथर्डी** : ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात बचत गट चळवळीचे मोठे योगदान असून या गटांमधून तयार होणाऱ्या उत्पादनांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या वतीने तालुकानिहाय उमेद मॉल सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा उपक्रम लवकरच सुरू होणार असल्याची माहिती आमदार मोनिका राजळे यांनी दिली.

जागतिक महिला दिनानिमित्त पाथर्डी येथील गोरे मंगल कार्यालयात राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत बचत गटांना निधी वितरण तसेच इमारत व इतर बांधकाम कामगारांना साहित्य व भांडी वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड, ज्येष्ठ नेते अशोक चोरमले, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, भाजप महिला आघाडीच्या अध्यक्षा काशिताई गोल्हार, शहराध्यक्ष ज्योती शर्मा, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा घुले, गटविकास अधिकारी संगीता पालवे, सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भीसले, उद्योजक नितीन एडके तसेच नगरसेवक-नगरसेविका आणि मोठ्या संख्येने बचत गटातील महिला उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना आमदार राजळे म्हणाल्या की, कष्टकरी वर्गाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठीही अनेक योजना प्रभावीपणे अंमलात आणल्या जात असून त्यातून सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत.

बचत गटांच्या माध्यमातून महिलांना व्यवहारज्ञान, बँकिंग व्यवस्था आणि कुटुंबाचे अर्थकारण समजून घेण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे कर्जफेडीचे प्रमाणही समाधानकारक असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळत आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महिलांसाठी विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जात असल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांना स्वयंपूर्ण करण्यासाठी सुरू करण्यात आलेली ‘लाडकी बहीण’ योजना बंद केली जाणार नाही, असे आश्वासनही शासनाने दिल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते बचत गटातील महिलांना धनादेशांचे वितरण करण्यात आले, तर बांधकाम क्षेत्रातील कामगारांना साहित्य व भांडी देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भीसले यांनी केले. सूत्रसंचालन राजीव सुरवसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संदीप फुंदे यांनी मानले. महिला दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन आणि स्थानिक प्रशासन प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट झाले.

## संजीवनीच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पातळीवर सुवर्णभरारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**कोपरगाव** : संजीवनी अॅकॅडमीचे विद्यार्थी अभिषेक शिवाजी निकम आणि ओंकार गोरक्ष दोंड यांनी राष्ट्रीय पातळीवरील अॅथेलॅटीक्स स्पर्धेत अनुक्रमे भाला फेक आणि गोळा फ ेक या क्रिडा प्रकारात सुवर्णपदक पटकाविले . या दैदीप्यमान यशानंतर संजीवनी ग्रुप ऑफ स्कुलच्या संचालीका डॉ.मनाली कोल्हे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

हे दोघेही इयत्ता आठवीत शिक्षण घेत आहेत. ही राष्ट्रीय अॅथलेटिक्स स्पर्धा गोव्यातील पेडेम स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मध्ये संपन्न झाली.राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धेत संजीवनी अॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. संजीवनीचे खेळाडू नेहमीच विविध क्रीडा प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या कौशल्याची आणि जिद्दीची प्रचिती देत असतात. नियमित सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेने दिलेल्या उत्तम क्रीडा सुविधा यामुळे विद्यार्थ्यांना हे यश मिळवता आले. या यशामुळे संजीवनी अॅकॅडम ीचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल झाले असून इतर विद्यार्थ्यांसाठीही हे प्रेरणादायी ठरले आहे.

या दोघा सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांनी आपल्या वेगवान, तांत्रिकदृष्ट्याा सक्षम आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर ही कामगीरी केली.

## महिलांसाठी नव्हे तर महिलांसोबत उभे राहणाऱ्यांना सलाम : सोनल शहा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव** : येथील संवेदना योगा सेंटरमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिलांच्या सन्मानासह आरोग्य, आत्मविश्वास आणि स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमात शेवगावच्या गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करत जागतिक म हिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, महिला दिनाच्या शुभेच्छा त्या सर्व संवेदनशील पुरुषांना आहेत जे महिलांच्या स्वप्नांचा आदर करतात आणि समानतेच्या प्रवासात खांद्याला खांदा लावून चालतात.

जे पुरुष ‘साथ’ देण्याचे महत्त्व जाणतात आणि महिलांसाठी नव्हे तर महिलांसोबत उभे राहतात, अशा सर्वांना महिला दिनाच्या शुभेच्छा असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, समाजात खरी समानता निर्माण करण्यासाठी स्त्री-पुरुषांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. समानता कुणी देत नाही, ती आपण सर्वांनी मिळून घडवायची असते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी योगा सेंटरमध्ये उपस्थित म हिलांनी आरोग्यदायी जीवनशैलीचा स्वीकार करत समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे आभार योगाचार्य लक्ष्मण महाराज नलवडे यांनी मानले.

## सैनिक स्कूल देवदैठण येथे जागतिक महिला दिन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**लिंपणगाव** : देवदैठण येथील सैनिक स्कूल, येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे सम ाजातील स्त्री शक्तीचा गौरव करण्यात आला असून, विविध मान्यवरांच्या मार्गदर्शनाद्वारे महिलांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमा पूजनाने व दीपप्रज्वलनाने झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच सौ. सुनीताताई वाघमारे व ग्रामपंचायत सदस्या सौ. रेश्माताई कोठाळे होत्या. यावेळी मोठ्या संख्येने पालक महिला उपस्थित होत्या.

यावेळी आयोजित करण्यात आलेल्या विशेष चर्चासत्रात अनेकांनी आपले विचार व्यक्त केले. पालकांमधून गणेशा वाघमारे आणि शितल थोरात यांनी जागतिक महिला दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त करत स्त्री शक्तीचा जागर केला. तसेच शिक्षक वर्गातून येवले मॅडम, शिल्पा झोडगे आणि संध्या गायकवाड यांनी महिला दिनाचे महत्त्व आणि आजच्या काळातील म हिलांची भूमिका यावर सविस्तर मत व्यक्त केले.

शिक्षिका वर्षा शिंदे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये महिला दिनाचे महत्त्व सांगतानाच, आजच्या काळात स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात मारलेली भरारी आणि त्यांचे समाजातील स्थान यावर प्रकाश टाकला. याच प्रसंगी आगामी रंगपंचमी या सणाचे आध्यात्मिक महत्त्व सांगण्यात आले. तसेच नैसर्गिक रंगांचा वापर करून सण साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन शिक्षिका कविता येवले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी उपस्थित सर्व महिलांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# वैजापुरात पुन्हा वाटमारी

## धाक दाखवून तरुणास लुटले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : वैजापूर येथून पुणे येथे जाण्यासाठी बस स्थानकात आलेल्या एका तरुणाला चाकूचा धाक दाखवून मारहाण केली. त्याच्याकडील २८ हजार रुपये हिसकावले. तसेच मारहाण सोडवण्यासाठी आलेल्या अन्य एकास हातातील लोखंडी कड्याने मारहाण करून पोबारा केला. ही घटना शनिवारी (७ मार्च) सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास बस स्थानक पॅटिसरात घडली. याप्रकरणी चार जणांविरुद्ध पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. काही दिवसापूर्वीच शहरातील बोथरा पेट्रोल पंपासमोर एका बिहारी तरुणाचे अपहरण करून त्याला लुटल्याचा प्रकार घडला होता. अशा घटना सातत्याने होत असल्याने शहरातील नागरिक धास्तवले असून पोलिसांनी याप्रकरणाची गंभीर दाखल घेण्याची मागणी नागरिकांनी केली आहे

दरम्यान, या घटनेत श्रीरामपूर येथील वाहन चालक अभिषेक शिवाजी भोसले (२२) यास मारहाण करून लुटण्यात आले असून त्याने पोलिसात फिर्याद दिल्यानंतर कुलदीप राजपूत, गणेश गायकवाड, यश पवार, गौरव त्रिभुवन (सर्व रा. वैजापूर) या चौघाविरुद्ध पोलिसांत वाटमारीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत पाटील गल्ली भागात राहणारे बाबासाहेब कचरू कडे हे जखमी झाले आहेत. त्यांच्या आयशर गाडीवर श्रीरामपूर येथील अभिषेक भोसले हा चालक म्हणून कामास आहे.

शनिवारी अभिषेक कडे यांच्या घरी आला व त्याने कडे यांच्याकडून पुणे येथे जाण्यासाठी ५० हजार रुपये उचल घेतले. पुण्याला जाण्यासाठी बस स्थानकात आल्यानंतर तिकीट काढण्यासाठी पैशाचे बंडल बाहेर काढले. त्यावेळी कुलदीप राजपूत्व त्याचा एक साथीदार भोसले याच्या जवळ आले. कुलदीप याने चाकूचा धाक दाखवून पैशाचे बंडल हिसकावून घेतले व तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र भोसले याने त्याचा पाठलाग करून पैशाचे बंडल मिळवले. त्यानंतर कुलदीप याने पुन्हा पाठीमागून येऊन मारहाण केली व पैसे हिसकावून घेतले. नंतर बुलेटवर आलेल्या तिघांनीही आम्हा दोघांना मारहाण करून पैसे हिसकावून घेतले असे भोसले याने पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## खून प्रकरणात तडजोडीचा आरोप; सहआरोपी सोडल्याचा दावा



**प्रश्न मात्र अजूनही तसाच**

कोकणगाव खूनप्रकरणात सत्य बाहेर येणार की फाईलमध्येच गाडले जाणार? असा प्रश्न उपस्थित केला जात असताना नातेवाईक यांना पोलीस बंदोबस्त देण्याची मागणी विविध संघटना करताना दिसत आहेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : कोकणगाव येथील खून प्रकरणाला नवा वादग्रस्त कलाटणी मिळाली आहे. या प्रकरणातील तपासात पोलिसांनी तडजोड घडवून आणत सहआरोपीला सोडून दिल्याचा गंभीर आरोप करत पीडित नातेवाईकांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन न्यायाची मागणी केली.

मयताच्या नातेवाईकांच्या मते, या खून प्रकरणाच्या तपासात किरण शिंदे व आढळगाव येथील राजकीय पुढारी यांनी कथितपणे तडजोड घडवून आणत सहआरोपीला सोडून दिले.तर काहींना तडजोड करता आले नसल्याने जेलमध्ये टाकले आहे एवढेच नव्हे तर तडजोडीसाठी दबाव टाकत नातेवाईकांना धमकावण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे.तसेच, तडजोड झाल्यानंतर प्रकरणात खुनाच्या गुन्ह्यात अॅट्रॉसिटी कायद्याचे वाढीव कलम लावून तो गुन्हा उपविभागीय पोलीस अधीक्षक कर्जत यांच्याकडे वर्ग करण्यात आला, ज्यामुळे मी काहीच केले नाही असा आभास पोलीस निरीक्षक यांनी निर्माण करण्याचा प्रयत्न श्रीगोंदा पोलिसांनी केला असून यामध्ये मोठा घोटाळा असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी पोलीस अधीक्षकांकडे केली.यावेळी पोलीस अधीक्षकांनी तक्रार ऐकून घेत प्रकरणाची तपासणी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.सध्या या आरोपांमुळे कोकणगाव खून प्रकरण पुन्हा चर्चेत आले असून, पोलिसांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता या प्रकरणात वरिष्ठ अधिकारी कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# श्रीगोंदा ते लोणीकंद ८३ किमी सायकल वारी

## साध्वीजी प्रीती सुधाजींना ‘राष्ट्र प्रेरणा माता’ पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**लिंपणगाव** : जागतिक महिला दिन आणि साध्वीजी प्रीती सुधाजी यांच्या ६४ व्या दीक्षा दिनाचे औचित्य साधत श्रीगोंदा येथील अग्नीपंख फौंडेशनच्या वतीने श्रीगोंदा ते लोणीकंद असा ८३ किलोम ीटरचा सायकल वारी उपक्रम आयोजित करण्यात आला. साविता शिंदे व रेश्मा डांगे यांच्या नेतृत्वाखाली रखरखत्या उन्हात ही सायकल वारी पार पडली.

या वेळी अहिंसा परमो धर्मः हा भगवान महावीरांचा संदेश आचरणात आणत समाजप्रबोधन करणाऱ्या साध्वीजी प्रीती सुधाजी यांना ‘राष्ट्र प्रेरणा माता’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे शाळकरी मुलींच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. अक्षदा पांडुळे (बाल जिजाऊ), राजनंदिनी सिनलकर (सावित्रीबाई), अनुष्का वाडगे (अहिल्यादेवी), समृद्धी घाडगे (रमाई), आरोही भोसले (शास्त्रज्ञ), कश्यप शेख (सैनिक) आणि गंगा गुप्ता (शेतकरी) यांनी सन्मान केला. मुलींच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना साध्वीजी प्रीती सुधाजी भावुक झाल्या.

कार्यक्रमात साध्वीजी प्रज्ञाजी व स्मिताजी यांनी आपल्या मधुर वाणीमधून प्रबोधन केले. तसेच प्रमुख पाहुण्या म्हणून सन्मानित मुलींना शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले. अक्षदा पांडुळे व राजनंदिनी सिनलकर यांनी ‘मी जिजाऊ, मी सावित्री बोलतेय’ या विषयावर प्रभावी विचार मांडले.

प्रास्ताविकात नवनाथ दरेकर यांनी सायकल वारीचे उद्दिष्ट तसेच ‘एक मुठ धान्य अनाथांसाठी’ या उपक्रमाची माहिती दिली. रांजणगाव सांडस, वाकळी व केसनंद येथे स्थानिक नागरिकांनी सायकल वारीचे उत्स्फुर्त स्वागत केले. या उपक्रमात अनेक सायकलपटूंनी सहभाग नोंदवला.

## महिलांसाठी प्रभावी योजनेची अंमलबजावणी करणार : सरपंच भोसले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पानेगांव** : दि.८ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांच्या विविध विषयांवर मंथन तसेच शासन स्तरावरून येणाऱ्या योजना प्रभावीपणे अंम लबजावणी करण्यासाठी गावातील प्रत्येक महिलेला सोबत घेणार असल्याचे पानेगांव (ता. नेवासे) ग्राम पंचायत लोकनियुक्त सरपंच निकीता भोसले शासन स्तरावरून विशेष आयोजित केलेल्या ग्रामसभेत

अध्यक्षस्थानावरून बोलतं होत्या. सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून वंदन करण्यात आले. वरिष्ठ महिला मार्गदर्शनपर मोलाचा सहभाग घेऊन माहिती दिली तसेच सरपंच भोसले यांनी ग्रामपंचायत मार्फत महिलांसाठी विविध स्वरूपाच्या योजना माहिती देण्यात आली. उपसरपंच सुरेश जंगले यांनी सामूहिक विवाह सोहळा साठी ग्रामपंचायत विशेष तरतूद करणार असून गावातील इच्छुकांनी ग्राम पंचायतकडे मागणी करावी असे आवाहन करण्यात आले



ग्रामविकासअधिकारी गणेश पाखरे यांनी महिला संदर्भात असणाऱ्या संपूर्ण कायद्याची माहिती व म ार्गदर्शन केले तसेच विविध अडचणी समजून घेतल्या व सांगितले.विषय पत्रिका बालविवाह कायदा२००६ मार्गदर्शन हुंडा प्रतिबंधक कायदा मार्गदर्शन कौटुंबिक हिंसाचार महिला चे संरक्षण कायदा २००५ महिला शासकीय योजना लैंगिक शोषण प्रतिबंध कायदा बॉक्स कायदा विशाखा मार्गदर्शन तत्त्वे कायदा घरगुती हिंजेदार प्रतिबंध कायदा २००५ आदी विषयांवर मार्गदर्शन केले.

यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

## वाकडी शिवारात बिबट्याचे चार बछडे आढळले

**श्रीरामपूर :** राहाता तालुक्यातील वाकडी शिवारात शुक्रवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास जाधव-पानसरे वस्ती परिसरात रस्त्यालगत असलेल्या शेतात बिबट्याचे चार बछडे आढळून आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती तात्काळ कोपरगाव वनविभागाला देण्यात आली आहे.

वाकडी शिवारातील जाधव-पानसरे वस्ती रोडवरून वाहनाने जात असताना रस्त्यालगत असलेल्या शेतात काही हालचाल होत असल्याचे प्रत्यक्षदर्शी उपसरपंच सुरेश जाधव व सागर जाधव यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ वाहन थांबवून गाडीच्या लाईटचा प्रकाश त्या दिशेने टाकला असता त्यांना त्या ठिकाणी तब्बल चार लहान बिबट्याचे बछडे दिसून आले. यावेळी त्यांनी बछड्यांचे फोटोही मोबाईलच्या कॅमेऱ्यात टिपले. यानंतर त्यांनी काही वेळ थांबून परिसरात मादी बिबट आहे का याचा अंदाज घेतला. मात्र बछड्यांजवळ मादी बिबटे दिसून आली नाही. कदाचित आसपासच्या परिसरात शिकारीच्या शोधात गेली असावी, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.



## स्थगिती उठताच गुहा येथे
# श्री कानिफनाथ महाराज यात्रोत्सवाला उत्साहात प्रारंभ







**दोन वर्षापासून मंदिर की दर्गा असा सुरू असलेला गुहा देवस्थानचा वाद शनिवारी सायंकाळी कोर्टाने त्यावरील स्थगिती उठविल्याने नागरिकांनी व ग्रामस्थांनी एकच जल्लोष केला व काल गुहा येथील कानिफनाथांच्या यात्रेला मोठ्या जल्लोषात सुरुवात झाली यावेळी नागरिकांनी व ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात महाआरतीसाठी गर्दी केली होती.**

**राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील गुहा येथील श्री कानिफनाथ महाराज यात्रोत्सवास उत्साहात प्रारंभ झाला असून यात्रोत्सवा निमित्त महाआरती माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, युवा नेते अक्षय कर्डिले व राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग यांच्या हस्ते संपन्न झाली. या प्रसंगी गुहा व पंचक्रोशीतील नाथभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या महाआरतीनंतर बोलताना माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी गुहातील हिंदू बांधवांच्या प्रश्नांबाबत ठोस भूमिका मांडली. गुहातील आमच्या हिंदू बांधवांचा प्रश्न एक घाव दोन तुकडे करत कायमचा मिटवावा, केंद्रात राज्यात आपल्या विचारांचे सरकार आहे. पुढील वर्षी होणारा यात्रोत्सव पोलीस बंदोबस्तात न होता गुहा गावचा देवस्थानचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. येणाऱ्या काळात राहुरी विधानसभेत कोणीही आमदार होवो त्याने गप्प न बसता गुहाचा प्रश्न मांडत मार्गी लावला पाहिजे अशी मागणी त्यांनी यावेळी व्यक्त केली.

युवा नेते अक्षय कर्डीले म्हणाले की, गुहातील अनधिकृत अतिक्रमणे काढल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. स्व. शिवाजीराव कर्डिले साहेबांचे स्वप्न असलेले भव्य-दिव्य श्री कानिफनाथ महाराजांचे मंदिर उभारणार असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जिल्ह्याचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून गुहाचा प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग यांनी सांगितले की, आम्ही संविधानावर चालणारे लोक आहोत. आम्ही वक्फ बोर्ड मानत नाही. हिंदुत्ववादी सरकारकडून गुहातील प्रश्न निश्चित मार्गी लागतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच महाराष्ट्र सरकारने धर्मांतरण कायदा लागू केल्याबद्दल त्यांनी सरकारचे आभार मानले.

या महाआरतीसाठी पंचक्रोशीतील व राज्यातील भाविक नाथभक्तांनी आणि विविध संघटनांनी हजेरी लावली होती. याप्रसंगी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

## कारेगाव येथे भुसार मालाच्या गोडाऊनला आग, लाखोंचे नुकसान



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव येथे साई सिद्धी ट्रेडिंग कंपनीच्या भुसार मालाच्या गोडाऊनला रविवारी मध्यरात्री साडेबारा ते एक वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या गोडाऊनचे मालक व कारेगाव ग्रामपंचायत सदस्य प्रणव अशोक भारत यांचे धान्य गोडाऊन असल्याची माहिती मिळाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार विजेच्या शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या आगीत गोडाऊनमध्ये साठवून ठेवलेला सोयाबीन, मका व कापूस असा मोठ्या प्रमाणातील भुसार माल जळून खाक झाला. या घटनेत अंदाजे ३५ ते ४० लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे.

घटनेची माहिती गोडाऊनचे मालक प्रणव भारत मिळताच सकाळी ६. वाजता ते तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मित्रपरिवार व ग्रामस्थांना देखील घटनास्थळी बोलावून घेत मदतकार्य सुरू केले. परंतु मध्यरात्री आग लागल्याने सर्व भुसारमाल जळून खाक झाला. व या व्यापाऱ्याचे मोठे नुकसान झाले.या घटनेची माहिती मिळाल्यानंतर संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी भेट दिली असून तालुका पोलीस स्टेशन या प्रकरणाचा पुढील कारवाहि करत आहेत.

## मुळा धरणात बुडून युवकाचा मृत्यू



**राहुरी :** अहिल्यानगर येथील पाच तरुण काल दि. ८ मार्च रोजी दुपारच्या दरम्यान मुळा धरण येथे फिरण्यासाठी आले होते. यावेळी मुळा धरणात पोहत असलेल्या दोघांपैकी एक तरुण पाण्यात बुडून मरण पावला. तर एका तरुणाला वाचविण्यात यश आले.

अहिल्यानगर येथील बालिकाश्रम रोड परिसरातील रहिवाशी असलेले मयुर लाला कांबळे, नैतीक सोनटक्के, रोहित कांबळे, विनय खिस्ती, आकाश प्रभूने सर्व रा. बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर असे पाच मित्र दि. ८ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजे दरम्यान राहुरी येथील मुळा धरण परिसरात फिरण्यासाठी आले होते. दरम्यान मयुर कांबळे व नैतीक सोनटक्के या दोघांना धरणाच्या पाण्यात पोहण्याचा मोह आवरला नाही. ते दोघे चमेली गेस्ट हाऊसच्या पाठीमागील बाजूस पीर बाबा दर्गा जवळ धरणाच्या पाण्यात पोहण्यासाठी उतरले.

दोघांना व्यवस्थित पोहता येत नसल्याने दोघेजण खोल पाण्यात बुडू लागले. त्यावेळी त्यांनी आरडा ओरडा केला. त्यावेळी अशोक केशव गायकवाड, किशोर चंद्रभान बर्डे, आमीन शिराज शेख, उमेश रमेश गंगे, रमेश अर्जुन निकम, संतोष एकनाथ गायकवाड, चांदभाई शेख, सरपंच अंकुश बर्डे आदि तरुणांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तातडीने पाण्यात उड्या मारून दोन्ही तरुणांना वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र या घटनेत मयुर लाला कांबळे, (वय २४ वर्षे, रा. बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर) हा तरुण पाण्यात बुडून मयत झाला तर नैतीक सोनटक्के याला वाचविण्यात यश आले.

मयत मयुर कांबळे याच्या पश्चात आई, वडील, दोन बहिण असा परिवार आहे. मयुर याच्या नातेवाईकांनी घटनेची माहिती मिळताच राहुरी येथे आले. मयुरला मृत अवस्थेत पाहून नातेवाईकांनी मोठा हंबरडा फोडला. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## श्रीरामपूर येथे तातडीच्या ग्रामसभेत वाळूचा कण उचलून न देण्याचा संकल्प



**श्रीरामपूर :** महसूल विभाग अहिल्यानगर यांच्या आदेशाने श्रीरामपूर तालुक्यातील वाळूपट्टयाचा लिलाव प्रक्रिया करण्यात आली असून लिलाव टेंडर प्रक्रिया झालेल्या रामपूर (कोकरे) येथील ग्रामस्थांसह महिलांनी अचानक तातडीची ग्रामसभा घेण्यात आली.

यामध्ये गावातील वाळू असल्यामुळे परिसरातील शेती विकसित झाली असून या शेतीवरच सर्व कुटुंब अवलंबून आहे, अद्याप गावातील वाळूचे रक्षण आम्ही केले असून वाळू लिलावामुळे गावातील एकोपा जावून तरुण नशेच्या आहारी जाऊन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे येथील वाळूचा कण देखील उचलु न देण्याचा संकल्प या ग्रामसभेमध्ये करण्यात आला.

अहिल्यानगर महसूल विभागातील लिलाव टेंडर प्रक्रिया झालेल्या श्रीरामपूर तालुक्यातील रामपूर (कोकरे) येथील वाळुचा लिलाव (ठेका) पुणे येथील एका एजन्सीने घेतला असून या संदर्भात संबंधित ठेकेदाराने जेसीबीच्या माध्यमातून रस्ता करण्याचे काम सुरू केले असल्याचे ग्रामस्थांना समजल्याने संबंधित जेसीबी चालकाला समज देत आमच्या गावातून वाळू आणि जाऊन देणार नसल्याचा निर्धार यावेळी ग्रामस्थांनी बोलून दाखवला. शहरातील गुंडटोळ्या गावात दहशत करतील तसेच तरुण पिढी नशेच्या आहारी जाऊन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे येथील वाळूचा उपसा होऊ देणार नसल्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

## आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल प्रशिक्षकपदी श्रीरामपूरचा 'गौरव'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** जागतिक व्हॉलीबॉल संघटना व व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते ५ मार्च २०२६ दरम्यान सवयी मानसिंग स्टेडियम,जयपूर, राजस्थान येथे लेव्हल-१ व्हॉलीबॉल प्रशिक्षक कोर्स आयोजित करण्यात आला होता. या कोर्सचे आयोजन राजस्थान व्हॉलीबॉल संघटना यांनी केले होते.

या प्रतिष्ठित कोर्ससाठी देशभरातून १५० पेक्षा अधिक प्रशिक्षकांनी अर्ज केले होते. त्यापैकी कठोर निवड प्रक्रियेनंतर ४५ प्रशिक्षकांची निवड करण्यात आली. विशेष बाब म्हणजे महाराष्ट्र राज्यातून केवळ २ प्रशिक्षकांचीच निवड या कोर्ससाठी झाली होती. त्यामध्ये श्रीरामपूरचे गौरव अरविंद डेंगळे यांचा समावेश होता.

या कोर्समध्ये ऋखतइ चे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक जी इ श्रीधरण यांच्या मार्गदर्शनाखाली आधुनिक व्हॉलीबॉल प्रशिक्षण पद्धती,खेळाडूंचा शारीरिक व तांत्रिक विकास,सराव नियोजन, खेळातील नवीन तंत्रज्ञान तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रशिक्षण पद्धतींबाबत सखोल मार्गदर्शन देण्यात आले. गौरव अरविंद डेंगळे हे सोमैया विद्या विहार अंतर्गत चालणाऱ्या श्री शारदा इंग्लिश सोमैया स्कूल,कोपरगाव येथे कार्यरत असून ते गेली २२ वर्षे व्हॉलीबॉल प्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्हॉलीबॉलचे प्रशिक्षण देऊन खेळाडू घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते सातत्याने करत आहेत.

हा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांचे समीर सोमैया (अध्यक्ष, सोमैया ट्रस्ट),पार्थ दोशी (मुख्य कार्यकारी अधिकारी,डत्रत्र्रख),सुहास गाडगे साहेब, प्राचार्य के एल वाकचौरे,माजी मुख्याध्यापिका सौ क दोशी, ओम महाले, राजेंद्र कोहाकडे, मनोज म्हस्के, सचिन गुलाटी, स्वामीराज कुलथे, हरिंदर बत्रा, नितीन बलराज, निरज त्रिपाठी,आशिष गरुड तसेच व्हॉलीबॉल खेळाडूंनी सत्कार करून अभिनंदन केले.तसेच महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवर व व्हॉलीबॉलप्रेमींनीही त्यांचे कौतुक केले.

या प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात व्हॉलीबॉलचा विकास करण्यासाठी अधिक जोमाने कार्य करणार असल्याचे गौरव डेंगळे यांनी सांगितले.

## ७५ व्या वर्षी ही वृत्तपत्र विक्री....
### इंदूबाई जाधव यांचा प्रेस क्लबच्या वतीने सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** नेवासा प्रेस क्लबच्या पुढाकाराने ७५ व्या वर्षी ही गेल्या पंधरा वर्षांपासून नेवासा एस टी स्टॅण्डच्या समोर वृत्तपत्र विक्रीसाठी आपल्या मुलास हातभार लावणाऱ्या श्रीमती इंदूबाई जाधव यांचा जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सन्मान करण्यात आला.नेवासा प्रेस क्लबचे अध्यक्ष व वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे मार्गदर्शक जेष्ठ पत्रकार गुरुप्रसाद देशपांडे यांच्या संकल्पनेतून हा अभिनव सन्मान करण्यात आला.


नेवासा एस टी स्टॅण्ड समोर छत्री लावून थाटविण्यात आलेल्या स्टॉलवर श्रीमती इंदूबाई जाधव यांचा हा सन्मान प्रेस क्लबच्या सर्व पत्रकार पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नेवासा नगरपंचायतचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांच्या हस्ते बुके व शाल घालून करण्यात आला.

प्रत्येक क्षेत्रात महिला ही आज पुढे येऊन आपल्या कामाची चुणूक दाखवत आहे,वयाच्या ७५ वर्षी ही आपला मुलगा संजय जाधव यांच्या वृत्तपत्र व्यवसायात खंबीरपणे पाठीशी उभ्या राहून हातभार लावण्याचे काम इंदूकाकू करत आहे त्यांचे कार्य हे महिलांसाठी प्रेरणादायी व समाजासाठी आदर्शवत असल्याचे गौरवोदगार नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांनी यावेळी बोलताना काढले व प्रेस क्लबने केलेल्या सन्मानाचे कौतुक केले.

यावेळी प्रेस क्लबचे मार्गदर्शक अशोकराव डहाळे, कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण,उपाध्यक्ष कैलास शिंदे,माजी अध्यक्ष मोहन गायकवाड,मीडिया प्रमुख शंकर नाबदे, सदस्य नानासाहेब पवार,शाम मापारी,मकरंद देशपांडे, सुहास पठाडे,रमेश शिंदे,पवन गरुड,वृत्तपत्र वितरण विभागाचे सचिव अहिल्याजी घोडके,नरेंद्र महाराज सत्संग मंडळाच्या सेवेकरी सौ.संगीता सुतार उपस्थित होत्या

## खा. निलेश लंके हे समर्पित नेतृत्वाचे उत्तम उदाहरण

### * माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांचे गौरवोद्‌गार
### * पारनेर ग्रामीण रुग्णालयात 'महाआरोग्ययज्ञ' आरोग्य शिबिराचे उद्‌घाटन




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** खासदार निलेश लंके हे समर्पित नेतृत्वाचे उत्तम उदाहरण असल्याचे गौरवोद्गार राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी काढले. स्वतःचा वाढदिवस जनतेच्या आरोग्यासाठी समर्पित करणाऱ्या लंके यांच्या कार्याचा सन्मान पारनेर येथे झाला.

नीलेश लंके प्रतिष्ठान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि आपला मावळा संघटनेच्या वतीने पारनेर ग्रामीण रुग्णालयात 'महाआरोग्ययज्ञ' आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर खासदार लंके यांच्या वाढदिवसानिमित्त, शरद पवार यांच्या संसदीय कारकिर्दीला ६० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आणि अजित पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन माजी मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते झाले.

टोपे म्हणाले, सरपंच ते खासदार असा प्रवास करताना लंके यांनी जनतेचा प्रचंड विश्वास संपादन केला. ते सामान्यांची भाषा बोलतात, माणसे वाचतात. त्यांचा कार्यकर्त्यांशी आत्मीय संबंध आहे. महाराष्ट्रभर त्यांची मागणी आहे. हृदयरोग वाढत असल्याने प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी सीपीआर प्रशिक्षण घ्यावे. अवयवदानाबाबत सकारात्मक मानसिकता निर्माण व्हावी. तामिळनाडूत दहापैकी सात जण अवयवदान करतात; महाराष्ट्रातही अशी परंपरा व्हायला हवी.

ते पुढे म्हणाले, आरोग्यमंत्री असताना लंके यांच्या पाठपुराव्याने पारनेरला उपजिल्हा रुग्णालय मंजूर झाले होते. सरकार बदलल्याने काम थांबले; पुन्हा पाठपुरावा करावा, आम्ही सहकार्य करू.खासदार नीलेश लंके म्हणाले, कोरोना काळात रुग्णसेवकांनी, डॉ. सतीश लोंढे यांनी उत्तम काम केले. आरोग्य आणि शिक्षणावर विशेष भर आहे. एक वर्षात एक लाख चष्मे वाटपाचे उद्दिष्ट आहे. शरद पवार यांच्या माध्यमातून ६० लाख रुपयांची रुग्णवाहिका मिळाली असून डोळे तपासणी सुरू आहे.

खासदार भास्कर भगरे म्हणाले, कोरोना काळात टोपे आणि लंके यांनी आदर्श निर्माण केला. लंके संसदेत मतदारसंघाचे प्रश्न सातत्याने मांडतात, प्रत्येकाच्या मदतीसाठी तत्पर असतात.

कार्यक्रमाला खासदार भास्कर भगरे, डॉ. किरण जाधव, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. सतीश लोंढे, नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, राणीताई लंके आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन जितेश सरडे, अमोल यादव यांनी केले.